# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ / श्रावण ५, १९४५ ( शके )**

**(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(६) महिला व बालविकास मंत्री**
**(७) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५६**

---

### हरीसाल (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील टेलिमेडिसीन सेवापूर्ववत सुरु करण्याबाबत

**(१) * १९९७५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील पहिले डिजीटल गाव अशी ख्याती असलेल्या हरीसाल (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सन २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या माध्यमातून टेलिमेडिसीन सेवा सुरू करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्गम परिसरातील आदिवासी व अन्य रूग्णांना मुंबई व पुणे यांसारख्या प्रगत शहरातील डॉक्टरांची मदत व्हावी, त्यांना वेळेवर उपचार मिळावे याकरिता सुरू करण्यात आलेली सदरहू सेवा सद्य:स्थितीत बंद पडलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.मायक्रोसॉफ्ट इंडिया प्रा.लि. यांचेशी करण्यात आलेला करार हा सन २०१९ मध्ये संपल्यानंतर सदर सेवा पूर्ववत सुरू ठेवण्यासाठी या कंपनीसोबत अथवा अन्य तत्सम कंपनीसोबत करार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, टेलिमेडीसीन सेवा सुरू राहण्यासाठी सन २०१९ नंतर शासनाने याकरिता किती निधीची तरतूद केली होती व त्याचा वर्षनिहाय तपशील काय आहे, तसेच या सेवेकरिता सन २०१९ नंतर निधी उपलब्ध करून दिलेला असल्यास ही सेवा बंद होण्याची अन्य कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू टेलिमेडीसीन सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मे. मायक्रोसॉफ्ट इंडिया प्रा. लि. यांचेशी करण्यात आलेला करार माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये संपुष्टात आला आहे. ई-संजीवनी टेलीकन्सलटेशन कार्यक्रमांतर्गत सद्यस्थितीत गरजेनुसार रुग्णांना टेलीमेडिसीन सेवा देण्यात येत आहे.
(४) सदरहू सेवा सुरू राहण्यासाठी सन २०१९ नंतर निधीची तरतूद करण्यात आली नाही. परंतु आयुष्मान भारत योजने अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र हरीसाल येथे टेलीकन्सल्टेशन सेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच ई-संजीवनी ओपीडी अंतर्गत देखील तपासणी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन शल्यचिकित्सक यांनी वित्तीय अनियमितता केल्याबाबत

**(२) * १९०४३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कोरोना काळात केलेल्या वित्तीय अनियमिततेबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे खरेदीचे लेखा परिक्षण करण्यात आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाच्या मुद्दयांच्या अनुषंगाने उपसंचालक यांच्या स्तरावर समिती स्थापन करून चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना संचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांना दिनांक ०२ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त सूचनेनुसार उपसंचालक स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे काय, असल्यास सामितीने अनियमिततेची चौकशी पुर्ण करून अहवाल सादर केला आहे काय,त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर अहवाल कधीपर्यंत सादर करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.

समितीच्या अहवालामध्ये प्राथमिकदृष्टया अनियमितता झाली असल्याचे व याबाबत विशेष लेखापरिक्षण करण्याचे नमुद आहे. सदर प्रकरणी समवर्ती लेखापरिक्षण झाले असून याबाबत लेखापरिक्षणाचे अनुपालन संस्थेकडून प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) लेखापरिक्षण पूर्ण झाल्यावर त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल.

-----------------

## राज्यात कोरोना कालावधीत अनाथ झालेल्या मुलांसाठी बाल न्याय निधीचे वाटप करण्याबाबत

**(३) * १९७२७ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात आई किंवा वडीलांच्या निधनामुळे एकल पालक असलेले किंवा दोन्ही पालकांच्या निधनामुळे अनाथ झालेल्या मुलांच्या शिक्षणासाठी व्यवस्था केलेल्या बालसंगोपन योजनेंतर्गत बाल न्याय निधीचे वाटप बहुतांश जिल्ह्यांमध्ये संथगतीने सुरु असून त्यामध्ये सन २०२१-२०२२ या वर्षाची रक्कम अद्याप अनेक बालकांना मिळालेली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे जमा झालेला दंड किंवा तत्सम रक्कमेतून कोरोना काळात पालक दगावलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी १० हजार रुपयांची रक्कम बाल न्यायनिधीच्या माध्यमातून जमा केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साधारणत: १ कोटी रुपयांच्या आसपास प्रत्येक जिल्ह्यासाठी ही रक्कम राज्य शासनाकडे जमा केली असून राज्य शासनाने ही रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे बाल संगोपनांतर्गत सुर्पूद केली असतानाही काही जिल्ह्यांमधील महिला व बाल विकास विभागाकडून एकल मुलांच्या नावावर १० हजार रुपयांची रक्कम जमा झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनाथ बालकांना शासनाच्या वतीने बालसंगोपन योजनेअंतर्गत १,१०० रुपयांचे अनुदान माहे जानेवारी, २०२३ पासून देण्यात आलेले नसून, सदर अनुदानात दरमहा रुपये १,१०० वरुन रुपये २,२५० एवढी केलेली वाढसुद्धा अद्याप अदा करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०२२- २०२३ या आर्थिक वर्षात माहे सप्टेंबर, २०२२ अखेर प्रत्येक लाभार्थी बालकाच्या बँक खात्यात प्रत्येकी ६ हजार ६०० रुपये जमा झालेले असून माहे ऑक्टोबर, २०२२ ते मार्च, २०२३ या सहा महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२१ अन्वये, सदर अनाथ बालकांच्या नावे ५ लाख रुपये मुदत ठेव ठेवण्याचा व सदर रक्कम २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्याजासह देण्याबाबतच्या घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील किती बालकांना मदत देण्यात आली, किती अनाथ बालकांना अद्याप मदतीचा लाभ मिळाला नाही याची जिल्हानिहाय विगतवारी काय आहे,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन अशा एकल पालक किंवा अनाथ मुलांना सदरची अनुदानित रक्कम तातडीने मिळण्याकरिता कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

कोरोना काळात एक वा दोन्ही पालकांचे निधन झालेल्या मुलांना बाल संगोपन योजनेचा लाभ देय करण्यात आला असून दि. ३१/०३/२०२३ पर्यंतच्या लाभाची रक्कम या सर्व मुलांना वितरीत करण्यात आली आहे.

बाल संगोपन योजनेसाठी निधीचे वाटप बाल न्याय निधीमधून करण्यात येत नसून या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्षाखाली निधीची तरतूद करण्यात येते.

(२) हे अंशतः खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल संकीर्ण याचिका क्र. ३७७/२०१८ मध्ये दि. २०/१०/२०२१ रोजी देण्यात आलेल्या आदेशान्वये कोविड १९ मुळे एक वा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या शाळा फी, वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य इत्यादी शैक्षणिक खर्चासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाकडे जमा दंडाच्या रकमेतून रू. २५,५३,२५,५४८ इतकी रक्कम बाल न्याय निधीमध्ये जमा करण्यात आली आहे.

तथापि, सदर रक्कम ही कोविड-१९ मुळे पालक गमावलेल्या सर्व बालकांना सरसकट वितरीत करणे अपेक्षित नसून न्यायालयाने विहीत केलेल्या निकषानुसार पात्र ठरणा-या मुलांनाच रु. १०,००० इतके एक वेळाचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात यावे असे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

कोविड १९ मुळे एक किंवा दोन्ही पालक गमावलेल्या बालकांच्या दि. ३१/१०/२०२१ पर्यंतच्या जिल्हानिहाय आकडेवारीच्या आधारे या निधीतून जिल्ह्यांना वितरीत करावयाच्या रकमेची गणना करण्यात आली असून, त्याआधारे जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विहीत केलेल्या निकषानुसार पात्र ठरणा-या मुलांनाच रु. १०,००० इतके एक वेळचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(४) हे खरे नाही,

बाल संगोपन योजनेंतर्गत मार्च, २०२३ पर्यंत बालकांच्या बँक खात्यावर रु. ११००/- प्रमाणे लाभ जमा करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १७/०२/२०२३ अन्वये दि. १/०४/२०२३ पासून रु. २२५०/- दरमहा प्रमाणे लाभ देण्यासाठी रु. ५४.८४ कोटी इतका निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीमधील अनुदान एकूण ६२,०५० इतक्या बालकांच्या बँक खात्यावर माहे एप्रिल व मे, २०२३ मध्ये जमा करण्यात आले आहे.

(६) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२३ अन्वये कोविड-१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या एकूण ८६९ बालकांच्या नावे प्रति बालक रुपये ५.०० लक्ष इतकी रक्कम दिनांक ७

जुलै, २०२३ पर्यंत जमा करण्यात आली आहे. तसेच २२ बालकांचे बँक खाते उघडण्याची प्रक्रिया जिल्हा स्तरावर सुरु असून त्याची जिल्हानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणेः

| **क्र.** | **जिल्हा** | **बालकांची संख्या** |
|---|---|---|
| १ | पुणे | २ |
| २ | सोलापूर | १ |
| ३ | सातारा | ८ |
| ४ | सांगली | २ |
| ५ | यवतमाळ | ४ |
| ६ | हिंगोली | २ |
| ७ | जालना | १ |
| ८ | चंद्रपूर | २ |
| **एकूण** | | **२२** |

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतीलसेंट जॉर्जेस रुग्णालयात स्वतंत्रपणे पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच अन्य जिल्ह्यांतील वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित विशेषोपचार रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(४) * १९७१६ श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सेंट जॉर्जेस रुग्णालयात स्वतंत्रपणे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासह अतिविशेषोपचार महाविद्यालय सुरु करण्यासाठी तसेच आरोग्य सेवांना अधिक बळकटी यावी ह्या हेतूने नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी व्हावी करण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून ४१०० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत मुंबईतील सेंट जॉर्जेस रुग्णालयात स्वतंत्रपणे पदव्युत्तर अभ्यासक्रम (पीजी) सुरु करण्यासह अतिविशेषोपचार महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पावर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती गठित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यांतील वैद्यकीय महाविद्यालयात अतिविशेषोपचार रुग्णालय सुरु करण्याचे नियोजित आहे काय,

(५) असल्यास, सदर यादीत पालघर तसेच नंदुरबार जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश आहे काय,

(६) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर समितीची कार्यकक्षा ठरवून सदर समितीचा अहवाल तातडीने प्राप्त होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील जनतेस वाजवी दरात आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने निवडलेल्या जिल्हयांतील वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम, कार्यान्वयन व संलग्नित रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनासाठी आशियाई विकास बँकेमार्फत ५०० दशलक्ष डॉलर्स इतका निधी उपलब्ध होणार आहे.
(२) अंशत: खरे आहे.

यासंदर्भातील परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत अधिष्ठाता, सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई यांना दि.१२.०७.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) आशियाई विकास बँकेकडून प्राप्त होणाऱ्या अर्थसहाय्यातून जे वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत, त्या प्रकल्पांसाठी शासन स्तरावरील नियंत्रण यंत्रणा म्हणून मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) मिरज (सांगली) येथील महाविद्यालयाशी संलग्नित अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत प्राप्त झाला आहे. तसेच औरंगाबाद, अकोला, यवतमाळ व लातूर येथे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालयांचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागपूर येथेही अतिविशेषोपचार रुग्णालय सुरु करणे नियोजित आहे.
(५) सद्यस्थितीत पालघर तसेच नंदूरबार जिल्हयातील वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्नित अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.
(६) व (७) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, शासन निर्णय दि.११.०५.२०२३ अन्वये सुकाणू समितीची कार्यकक्षा यापूर्वीच निश्चित करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (पूर्व) एम.आय.डी.सी येथील बंद असलेले कामगार रुग्णालय पूर्ववत सुरु करणेबाबत

**(५) * १९५२८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अंधेरी एम.आय.डी.सी. भागातील राज्य विमा निगम महामंडळाच्या (ईएसआयसी) कामगार रुग्णालयास सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लागलेल्या आगीनंतर रुग्णालय अदयाप बंद अवस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामगार रुग्णालय गत ५ वर्षांहून अधिक काळापर्यंत बंद असून आगीच्या दुर्घटनेनंतर सदर रूग्णालयाची इमारत दुरूस्ती व नुतनीकरणाकरीता बंद ठेवण्यात आली होती परंतु सदरहू रुग्णालय तातडीने सुरु करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनानुसार केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळाकडून सुरु असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, अंधेरी येथील रुग्णालयास अग्नि सुरक्षेबाबत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या दृष्टीने राज्य कामगार विमा महामंडळाचे संबंधित वास्तुविशारद यांच्याकडून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपचाराकरिता आजारी कामगारांची व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून, सदर रूग्णालय त्वरित सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या अधिनस्थ राज्य विमा निगम महामंडळामार्फत सदरहू रुग्णालय दुरुस्ती करण्यास्तव इमारत पूर्णत: रिकामी करण्यात आलेली असून, इमारतीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम मे.एनबीसीसी या कंपनीला देण्यात आलेले आहे.

सदरहू रुग्णालयाच्या सुविधा तात्पुरत्या स्वरुपात कांदिवली येथील रुग्णालयाच्या इमारतीत हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदरहू रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागातील दुरुस्तीचे काम पुर्णत्वास आलेले असून, अग्निशामन विभागाचे ना-हकरत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर तसेच उर्वरीत दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर तेथील आंतररुग्ण व बाह्य रुग्ण विभाग सुरु करण्याचे महामंडळाचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना करिअर विषयक संधीची माहिती घेण्याकरिता कायमस्वरुपी हेल्पलाईन क्रमांक व ई-मेल सुरु करण्याबाबत

**(६) * १९४९६ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थी, युवक, युवतींना आणि पालकांना करिअर विषयक विविध संधींची माहिती घरबसल्या घेता यावी यासाठी लवकरच कायमस्वरूपी हेल्पलाइन क्रमांक व ई-मेल सुरू करण्यात येणार

असल्याची बाब त्याचबरोबर येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) विद्यार्थ्यांना दरमहा पाचशे रुपये विद्यावेतन देण्यात येईल अशी घोषणा कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री महोदयांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौशल्य विकास विभागांतर्गत असलेले व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यांत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना वाढीव विद्यावेतन देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील विद्यार्थी, युवक, युवतींना आणि पालकांना करिअर विषयक विविध संधीची माहिती घरबसल्या घेता यावी यासाठी कायमस्वरूपी हेल्पलाइन नंबर व ई-मेल सुरू करण्याबाबत तसेच राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना वाढीव विद्यावेतन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर शिबिरामध्ये दि. ६ मे ते ६ जून, २०२३ या कालावधीत विद्यार्थी, युवक व युवतींना इ. १० वी व १२ वी नंतर शैक्षणिक अभ्यासक्रम, रोजगाराच्या संधी (करिअर संबंधी) याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

(३) व (४) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक, खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या मर्यादेत आहे त्यांचे विद्यावेतन रु. ४० वरुन रु. ५०० करण्याबाबत मंत्रिमंडळ प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. तसेच राज्यातील विद्यार्थी युवक व युवती आणि पालकांना करिअर विषयक विविध संधीची माहिती घरबसल्या घेता यावी यासाठी कायमस्वरूपी हेल्पलाइन क्रमांक व ई-मेल सुरू करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेमधील सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) यांच्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदांबाबत

**(७) * १९६४४ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हापरिषदेमधील सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) यांच्यामार्फत मागील काही महिन्यांपासून प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या ई-निविदांपैकी काही ई-निविदा नियमानुसार नसल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने ई-निविदा भरण्यासाठी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट दिली असता त्यामधील ई-निविदा सूचना डाऊनलोड केल्यानंतर सदर सूचना कोणालाही समजणार नाही अशा भाषेमध्ये डाऊनलोड होत असून, सदर सूचना मराठी आणि इंग्रजी किंवा हिंदी भाषेमध्ये दिसणे अपेक्षित असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) यांच्या सूचना दिसत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, जिल्हा परिषदेच्या इतर विभागांच्या सर्व ई-निविदा शासनाच्या वेब पोर्टलवर समजतील अशा डाऊनलोड होत असताना केवळ सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण)च्या ई-निविदा दिसत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही,
सर्व ई - निविदा नियमानुसार प्रसिद्ध करण्यात आल्या असून सर्व निविदांना प्रतिसाद मिळालेला आहे.
(३) व (४) हे खरे नाही,
संगणकीय भाषा असल्याने निविदा सूचना दिसण्यामध्ये अडचणी येऊ शकतात. यापुढे सर्व स्तरावर वापरली जाणारी युनिकोड ही संगणकीय भाषा वापरुन निविदा सूचना प्रसिद्ध करणेची दक्षता घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामासाठी तसेच ऑनलाईन काम करण्यासाठी मोबाईल उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) * १९१५८ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामासाठी पोषण ट्रॅकर ॲपमध्ये मराठी भाषेत माहिती टंकलिखित करण्याची सुविधा तसेच ऑनलाईन काम करण्यासाठी उत्तम दर्जा व कार्यक्षमता असलेले मोबाईल उपलब्ध करुन देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तातडीने पालन करुन राज्यातील अंगणवाडी सेविकांना मोबाईल देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यात एक लाखापेक्षा अधिक अंगणवाडी कर्मचारी कार्यरत असून त्यांना महिला बाल विकास विभागाकडून मराठीमध्ये पोषण ट्रॅकर भरण्यासाठी ॲप विकसित करून दिले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाकडून अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेले मोबाईल फोन हे सदोष व कालबाह्य झाल्याने त्यात तपशील भरण्यास अनेक अडचणी येत असून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अंगणवाडी सेविकांना चार महिन्यांच्या आत मोबाईल फोन देण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, राज्यात महिला व बालविकास विभागाच्या एक लाखापेक्षा अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे विविध माता व बालकांसाठी सेवा पुरविणे हे महत्वाचे कर्तव्य असून यात केंद्र व राज्य शासनामार्फत संयुक्तिकरित्या एकात्मिक बाल विकास प्रकल्प चालविला जात असून या उपक्रमाच्या अंतर्गत विविध योजना कार्यान्वीत असून त्याकरिता राज्यातील सर्व महिला मराठीतून डेटा भरण्याची मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, पोषण ट्रॅकर ॲप केंद्र शासनाने विकसित करुन दिल्यास त्याद्वारे लाखो बालके व माता यांची अद्ययावत आकडेवारी नोंदविता येऊन शासनाला नियोजन करुन धोरण आखताना त्याचा उपयोग होईल यासाठी मराठी भाषेमधील ॲप्लीकेशन असणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तातडीने पालन करुन राज्यातील अंगणवाडी सेविकांना अद्ययावत मोबाईल देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४), (५), (६) व (७) केंद्र शासनाने अंगणवाडी सेविकांकरिता मराठी भाषेसह इतर स्थानिक भाषांमध्ये माहिती भरण्याची सुविधा पोषण ट्रॅकर ॲप्लीकेशनमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच, अंगणवाडी सेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन केंद्र शासनाच्या GEM PORTAL वर मोबाईल फोन खरेदी संदर्भात निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. त्यापुढील प्रक्रिया शासनाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणानुसार पूर्ण करण्यात येईल.

-----------------

## मुळशी व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील डोंगर माथ्यावरील धनगर वस्त्यांकरिता पाण्याची उपाययोजना करण्याबाबत

**(९) * १८८०६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील कोंढुर , भातराशी, मालेगाव, धनगरवस्ती तसेच वेल्हे तालुक्यातील कुरण बुद्रुक डोंगरमाथ्यावरील धनगरवस्ती, टेकपोळे गावच्या डोंगरावरील धनगरवस्ती इत्यादी भागांतील धनगर बांधवांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळशी व वेल्ह्यातील डोंगराळ भागातील धनगर बांधव हे झऱ्याचे पाणी, पावसाळयात साचलेले कोंडीतील पाणी, पाणवठे, छोट्या विहिरी यावर अवलंबून असतात परंतु कडक उन्हामुळे पाणवठे आटून गेल्याने धनगर बांधवांना जनावरांसाठी व रोज लागणारे पाणी मिळविण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वरील डोंगराळ भागातील गावांत राहणाऱ्या धनगर बांधवांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

मुळशी तालुक्यातील कोंढुर, भातराशी, माळेगाव, धनगरवस्ती मध्ये एकुण ८ ते १० कुटूंब असून, सद्य:स्थितीत तिथे एकुण ३ विहीरी आहेत. त्या विहिरीस मुबलक पाणी असून तेथील सर्व नागरिक विहिरीतुन पाणी उपसा करीत आहेत.

वेल्हे तालुक्यातील कुरण बुद्रुक, डोंगरमाथ्यावरील धनगरवस्ती येथे ९ घरे असुन, सद्य:स्थितीत तेथे शिवकालीन टाकी असुन व जलयुक्तशिवार या योजनेअंतर्गत विहीर करण्यात आली आहे. व तेथील सर्व नागरिक सदरील विहीर व शिवकालीन टाकीतुन पाण्याचा उपसा करीत आहेत.
(२) हे खरे नाही.

मुळशी तालुक्यातील कोंढुर येथे अस्तित्वातील ३ विहिरींना मुबलक पाणी असुन सर्व घरांना पाणी पुरवठा होत आहे. व त्याचप्रमाणे जनावरांना देखील विहिरीतुन उपसलेले मुबलक पाणी उपलब्ध आहे.

वेल्हातील डोंगराळ भागातील धनगर बांधव हे झऱ्याचे पाणी व साठवण टाकी वरुन पाण्याचा वापर करतात. मान्सुन लांबणीवर गेल्याने पाणी आटुन गेल्यानंतर धनगर बांधवांना जनावरांसाठी पाण्याची गैरसोय होते. त्या अनुषंगाने स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना या योजनेअंतर्गत साठवण टाकी व इतर उपांगे प्रस्तावित करण्यात येत आहे.
(३) सदर प्रकरणी उप विभागाने चौकशी केली असुन, सदर चौकशीत असे आढळुन आले आहे की, मुळशी तालुक्यातील माळेगाव मधील वाड्यावस्त्या ह्या विखुरलेल्या असुन तेथे कमी लोकसंख्या व कुटुंब संख्या असुन गावठाणातील योजनेमार्फत पाणीपुरवठा करणे शक्य नाही.

धनगरवस्तीमध्ये असलेल्या अस्तित्वातील विहीरीवरुन उपाययोजना करावी लागणार आहे. स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना अंतर्गत उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच वेल्हे तालुक्यातील कुरण बुद्रुक, डोंगरमाथ्यावरील वाड्यावस्त्या ह्या विखुरलेल्या असुन तेथे कमी लोकसंख्या व कुटूंब संख्या असुन गावठाणातील योजनेमार्फत पाणीपुरवठा करणे शक्य नसुन सदरील वाड्यावस्ती साठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना करणे गरजेचे असुन त्या अनुषंगाने स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना अंतर्गत उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौजे देवळाणा (ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद) येथील गिरजा नदीवरील पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(१०) * १८८२६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवळाणा  (ता.खुलताबाद,जि.औरंगाबाद) परिसरातून गिरजा नदी वाहत असून, नदीचे पात्र किमान २०० फुटांचे असून या नदीवर मागील ६ वर्षांपूर्वी नळकांडी पुलाचे करण्यात आलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने तेथील ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीवरील पूल वाहून गेला असून, नदीच्या पलीकडील जिल्हा परिषदेच्या मराठी/उर्दु माध्यमाच्या इयत्ता ७ वी पर्यंतच्या शाळेत ये-जा करणे विदयार्थ्यांना अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून देवळाणा गावातील मंदीर, मस्जिद, शादीखाना इत्यादी ठिकाणी शाळा भरविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गिरजा नदीवर पुलाचे बांधकाम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर नळकांडी पूल सन २०१८-१९ या वर्षात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आला असून पूल सुस्थितीत आहे.  मात्र सन २०२१-२२ वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे पुलाच्या दोन्ही बाजूचा भराव वाहून गेला आहे.

अतिवृष्टीवेळी १ ते २ दिवस विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी अडचणीचे झाले होते.

(३) हे खरे नाही.

(४) रा.मा.२१६ ते देवळाणा (बु) हा ग्रामीण मार्ग क्र.२६ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्याच्या सा.क्र.०/१०० या ठिकाणी नळकांडी पुल सुस्थितीत असून सन २०२१-२२ वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे पुलाच्या दोन्ही बाजूचा भराव वाहून गेला होता.  त्यामुळे भरावाच्या ठिकाणी मुरुम टाकून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली असून सद्यस्थितीत पुलावरुन विद्यार्थी ये-जा करीत आहेत.  सदर पुलाच्या दुरुस्तीचे व भरावाचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राधान्याने हाती घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## देवळी (जि. वर्धा) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेची कामे सुरु करण्याबाबत

**(११) * १९३७७ श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळी (जि.वर्धा) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सन २०१८ मध्ये ३४ कोटी रूपयांची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर होवूनही अद्याप सुरू झाली नसल्याचे दिनांक २४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत लाखो रूपये खर्च करूनही  सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वर्धा जिल्ह्यातील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामांना गती मिळून आवश्यकता असेल तिथे नवीन योजना प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

योजनेची ९८% काम पूर्ण झाले असून मे, २०१८ पासून देवळी शहरास नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. Express Feeder वगळता सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. योजनेच्या Express Feeder करीता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे सुचनेनुसार कामे पुर्ण केल्यावर जास्तीच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक दि. १४.११.२०२२ ला प्राप्त झाले. त्यानुसार कामे करुन Electrical Inspector चे परवानगीने विद्युत प्रवाह सुरु करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर कामे माहे ऑगस्ट, २०२३ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३) शहराच्या पाणी पुरवठा योजनेकरीता बंधारा, सोलर प्लँट योजनेचे Automation तसेच गावठाणातील वितरण व्यवस्था इत्यादी कामांकरीता अमृत - २ अभियानांतर्गत रु.१९१३.३० लक्ष किंमतीचा प्रस्ताव शासनाकडे प्रशासकीय मंजूरीकरीता सादर केला आहे. सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलीपाडा (ता.साक्री, जि.धुळे) येथे चमकणारी मेणबत्ती (स्पार्कल कँडल) बनविण्याच्या कारखान्याला आग लागून कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१२) * १९९३३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निजामपुरजवळील चिखलीपाडा (ता.साक्री,जि.धुळे) येथे चमकणारी मेणबत्ती (स्पार्कल कँडल) बनविण्याच्या कारखान्याला दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत चार महिला कामगारांचा मृत्यू झाला असून एक महिला व एक मुलगी जखमी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीत आशाबाई भागवत, पुनम भागवत, नैनाबाई माळी व सिंधुबाई राजपूत या चार महिलांचा मृत्यू झाला असून संगीता चव्हाण व निकिता महाजन या गंभीर जखमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृतरित्या सुरु असलेल्या कारखान्यात काही बालकामगारदेखील काम करीत असून कारखान्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात आल्या नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय, तसेच सदर आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मृत्यूमुखी पडलेल्या महिला कामगारांच्या कुटूंबियांना तसेच गंभीर जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५ ) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) भवानी सेलेब्रेशन्स् , गट नंबर - १६५, मु.पो.वासखेडी, ता.साक्री, जि.धुळे या कारखान्यात दि.१८.०४.२०२३ रोजी दु.०२.४५ वा. सुमारास आग लागली.

सदर आगीच्या दुर्घटनेत श्रीमती आशाबाई भागवत, कु. पुनम भागवत, श्रीमती नैनाबाई माळी, श्रीमती सिंधुबाई राजपुत या ४ महिला कामगारांचा दुर्घटनेत जागीच मृत्यू झालेला आहे.

तसेच, श्रीमती. संगिता चव्हाण व कु.निकीता महाजन या जखमी महिला कामगारांपैकी श्रीमती. संगिता चव्हाण या महिला कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे.

(३) सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची दि.१९.०४.२०२३ रोजी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान घटनेच्या दिवशी कारखान्यातील Mixing & Filling Shed मध्ये स्पार्कल कँडलमध्ये कच्च्या मालाचे मिश्रण असलेली पावडर (नायट्रोसेल्युलोज, पोटॅशिअम क्लोराईड, आयर्न पावडर) भरत असतांना अचानक आग लागली. त्याठिकाणी ठेवलेल्या कच्च्या मालाच्या मिश्रणामुळे आग अधिकच पसरली गेल्याने सदर दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर कारखान्याच्या व्यवस्थापनाने कारखाना अधिनियम,१९४८ अंतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे नोंदणी व परवान्यासाठी अर्ज केलेला नसून, कारखाना विनापरवाना सुरु होता. तथापि, कारखाना भोगवटादार श्रीमती.रोहिणी कुवर यांनी दुकाने व आस्थापना अधिनियम,२०१७ च्या नियम ९ नुसार दि.०१.०९.२०२१ रोजी सुचना पावती घेतली आहे.

सदर दुर्घटनेत, कु. पुनम भागवत या किशोरवयीन कामगाराचा मृत्यू झाला आहे.

(४) सदर दुर्घटनेतील ५ मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी रु.१.०० लाख याप्रमाणे एकूण ५ लाख इतकी आर्थिक मदत जिल्हाधिकारी, धुळे यांचेमार्फत दि.०५.०७.२०२३ रोजी धनादेशाद्वारे अदा केली आहे.

तसेच, सरकारी कामगार अधिकारी, धुळे यांनी दि.२४.०४.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये सदर दुर्घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना कामगार नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यासाठी कामगार न्यायालय तथा आयुक्त कामगार नुकसान भरपाई, धुळे यांना माहिती सादर केली आहे. त्यानुसार, कामगार न्यायालय, धुळे यांचेमार्फत संबंधित आस्थापना मालकांना दि.०५.०७.२०२३ नुसार नोटीस काढण्यात आली आहे.

कारखाना व्यवस्थापनामार्फत महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियमांचा भंग केल्याने तसेच, कारखाना विना परवाना सुरु असल्याचे आढळून आल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध प्रथम न्यायदंडाधिकारी, साक्री यांच्या न्यायालयात दि.०५.०७.२०२३ रोजी खटला क्र.००००३७२/२०२३ तसेच कारखाने अधिनियम,१९४८ च्या नियम भंगाबाबत दि.१०.०७.२०२३ रोजी खटला क्र.३८२/२०२३ असे दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

उपरोक्त चौकशीव्यतिरिक्त, कारखान्यातील अपघात प्रकरणी क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन किमान वेतन अधिनियम,१९४८ व वेतन प्रदान अधिनियम,१९३६ अंतर्गत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने कारखाना मालकाविरुद्ध प्रथम न्यायदंडाधिकारी, साक्री यांचे न्यायालयात खटला क्र.S.C.C.३३८/२०२३ व खटला क्र.S.C.C.३४०/२०२३ असे दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

सदर दुर्घटनेप्रकरणी पोलीस स्टेशन निजामपुर,ता.साक्री येथे कारखान्याचे दोन भागीदार, जागेचे मालक व कारखान्यातील एका कामगाराविरुद्ध फौजदारी गुन्हा क्र.००७३/२३ दाखल करण्यात आला असून, सदर चारही आरोपींना पोलीसांनी अटक केलेली आहे. तसेच, कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया सद्यस्थितीत बंद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमधून ६४१ रुग्णालयांना वगळण्यात आल्याबाबत

**(१३) * १९५५६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील गरीब रुग्णांना मोफत उपचार दिले जात असून, शासन व रुग्णांची फसवणूक केल्यामुळे राज्यातील ६४१ रुग्णालयांना या योजनेतून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांना रुग्णांकडून विहित पॅकेजपेक्षा अधिक शुल्क घेणे, अतिरिक्त देयक दाखविणे, कोरोना काळात काही रुग्णांना या योजनेच्या नावाखाली उपचार नाकारणे अशा तक्रारी निदर्शनास आल्यामुळे या योजनेतून वगळण्यात आले तसेच काही रुग्णालयांनी सदर योजनेतून बाहेर पडण्याची अनुमती मागितली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संबंधित रुग्णालयांवर निधीची भरपाई करण्याचे आदेश देऊन कारवाई करण्याच्या दृष्टीने तसेच सदर योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांत दारिद्र्य रेषेखालील गरीब रुग्णांना योग्य उपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीमार्फत ६०७ रुग्णालयांवर शिस्तभंगाची कारवाई म्हणून त्यांचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे. तसेच ७७ रुग्णालयाने स्वत:हून योजना रद्द करण्याच्या केलेल्या विनंतीवरुन त्यांचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे. मात्र रुग्णालयांचे अंगीकरण रद्द केले किंवा काही रुग्णालयाने स्वत:हून अंगीकरण रद्द करण्याची विनंती केली तर त्याऐवजी नवीन रुग्णालये अंगीकृत करण्यात येतात.

(३) योजनेंतर्गत रुग्णांकडून पैसे घेण्याच्या एकूण ३१७०३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ३०३८७ तक्रारींचे निराकरण झाले असून १३१६ तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेत आहेत. तसेच आजतागायत १३,७७,९८,०४०/- एवढया रक्कमेचा परतावा तक्रारदारांस करण्यात आला आहे.

रुग्णालयाच्या तक्रारीच्या अनुषंगाने नियमितपणे समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीमार्फत रुग्णालयांचे निलंबन किंवा रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण व जिल्हा मार्ग रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) * १९८६१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ९ हजार ३९३ कि.मी. ग्रामीण मार्ग व १ हजार ३८४ इतर जिल्हा मार्ग असे दोन्ही प्रकारचे एकुण १० हजार ७७८ कि.मी.लांबीचे रस्ते जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबधित रस्त्यांच्या डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमधुन निधी वाटप होत असताना तुकडीकरण पध्दतीने व टप्याटप्प्याने होत असल्याने १० ते १५ कि.मी. लांबीच्या रस्त्यावर एक ते दीड कि.मी.डांबरीकरण व मजबुतीकरण होत असल्याने जिल्हा परिषदेच्या ताब्यातील रस्त्यांची दिवसेंदिवस दुरवस्था होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदांच्या ताब्यातील संपूर्ण लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण मार्ग रस्त्यांची लांबी ९३७७.३७ कि.मी. व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची लांबी १२२५.३३ कि.मी. अशी एकूण १०६०२.७० कि.मी. आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण रस्त्यांच्या लांबीचा विचार करता जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत रस्ते दुरुस्तीसाठी मर्यादीत स्वरुपात निधी प्राप्त होतो. ग्रामीण मार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याच्या अनुषंगाने रस्त्यांची कामे केली जातात.
(३) सोलापूर जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजना व रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) अंतर्गत मागील चार वर्षात साधारणपणे रु.२२९.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजना या अंतर्गत देखील ग्रामीण रस्ते दुरुस्तीकरिता सोलापूर जिल्ह्यासाठी साधारणपणे रु.६३३.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

यापुढे देखील ग्रामीण रस्त्यांची नवीन कामे आणि देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(१५) * १८९२६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायदे ग्रामपंचायत (ता.मोखाडा, जि.पालघर) हद्दीतील कुमारी छाया भोई या सात वर्षीय बालिकेचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंशावरील औषधसाठा उपलब्ध असताना देखील केवळ वैद्यकीय अधिकारी सर्पदंशाचे निदान करण्यात अपयशी ठरल्याने निष्पाप बालिकेचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीत केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सर्पदंश झालेल्या बालिकेवर वैद्यकीय उपचार करण्यात कसूर करणाऱ्या खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
रूग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रात आला त्यावेळी ५० नग सर्पदंशावरील लससाठा उपलब्ध होता. रूग्णाच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार Snake Bite, Insect Bite की Unknown Bite या निदानामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांना संभ्रम निर्माण झाल्यामुळे रूग्णास सर्पदंशावरील औषध तेथे साठा उपलब्ध असतानाही रूग्णास दिले गेलेले नाही.
(३) या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांनी चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली होती. सदर समितीने चौकशी अहवाल दि. ०९.०६.२०२३ रोजी जिल्हा परिषद, पालघर यांना सादर केला आहे. सदर चौकशी अहवालात रूग्णावर योग्य ते उपचार न केलेल्या कर्तव्यावरील दोषी आढळलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्याची शिफारस उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे कार्यालयाकडे केलेली आहे. सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्याकडील अहवाल अद्याप अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यांनतर वैद्यकीय अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस. सी. व्होकेशनल) अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या शाळांना व शिक्षकांना अनुदान देण्याबाबत

**(१६) * १९२२३ श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय ( एच. एस. सी व्होकेशनल ) अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या शाळांना व शिक्षकांना अनुदान देण्यात आले नसून उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी.व्होकेशनल) अभ्यासक्रमांचा समावेश असलेल्या शिक्षकांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकरीता (एच.एस.सी. व्होकेशनल, पूर्वीचे किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रतिवर्षी वेतन खर्चाच्या ७५ टक्के प्राप्त होणारे अनुदान केंद्र शासनाने बंद केल्यामुळे सन १९९८-९९ पासून राज्य शासनाने या योजनेतंर्गत व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या संस्थांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याच्या घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या दिनांक २७ डिसेंबर, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, दिनांक २७ डिसेंबर, २०१८ नंतर देशातील सर्व कौशल्य शिक्षण/प्रशिक्षण कार्यक्रम हे एन.एस.क्यू.एफ. (National Skill Qualification Framework (N.S.Q.F.) मानकाशी सुसंगत असणे अनिवार्य असून, एन.एस.क्यू.एफ. मानकाशी सुसंगत नसणाऱ्या कोणत्याही अभ्यासक्रमाला उत्तेजन व अर्थसहाय्य न देण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी एच.एस.सी.(H.S.C.) स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांचे (H.S.C.Voc.) रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्यात आली असून, सदर समितीच्या अहवालावर सुरु असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

(२) सन १९९८-९९ पासून राज्य शासनाने या योजनेतंर्गत व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करू इच्छिणाऱ्या संस्थांना कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असून तो अद्यापपर्यंत लागू आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मा.श्री.विक्रम काळे, विधान परिषद सदस्य यांचे अध्यक्षतेखालील समितीने अहवाल सादर केला असून सदर अहवाल मा. मुख्यमंत्री महोदय यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही .

-----------------

## वायंगणे (जि.रत्नागिरी ) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील बाव नदीवरील बंधाऱ्यामुळे शेतजमिनीचे नुकसान होत असल्याबाबत

**(१७) * १९३४७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायंगणे (जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील बाव नदीवर बंधारा बांधण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत करण्यात येत असून, सदर ठिकाणी सुरुंग लावल्यामुळे नवलेवाडी ग्रामस्थांच्या राहत्या घरांना हादरे बसल्याने तडे गेले असून घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घरांची पाहणी विभागातील अभियंता यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी बंधारा झाल्यास लगतच्या शेतजमिनीचे नुकसान होऊन त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.

धरणाचे बांधकाम हे नदीपात्रात दोन्ही काठांच्या पातळीपेक्षा सुमारे १.५ मी. ते २.० मी. खाली राहणार असल्याने धरणात साठा होणाऱ्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान होणार नाही.
(४) के.टी. विअर बंधाऱ्याच्या वरील बाजूस सरासरी ५०० मी. अंतरावर व १०० मी. पेक्षा जास्त उंचीवर वायंगणे गावातील ३५ ते ४० घरे असलेली नवले वाडी वसलेलीआहे. सदर घरांपैकी ०३ घरमालकांनी बंधाऱ्याकरिता घेण्यात आलेल्या सुरुंगामुळे घरांना तडे गेल्याबाबत विभागीय कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहारानुसार व ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत ग्रामस्थासमवेत दिनांक ०४.०७.२०२३ रोजी पहाणी करण्यात आली. सदर पहाणीमध्ये वाडीमध्ये सुमारे दोन पिढयांची कच्च्या स्वरुपातील दगड-मातीच्या घरांना व गोठयांना कोणत्याही प्रकारचे तडे अथवा हानी पोहचली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. याव्यतिरिक्त ज्या ११ पक्क्या स्वरुपातील बांधकामाच्या घरांची पहाणी केली त्या घरांना गेलेले तडे अथवा झालेली हानी ही सुरुंगामुळे झालेली नसून तांत्रिकदृष्टया सदोष बांधकामामुळे झालेली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भरपाई विमा योजना पध्दतीने सुरु करण्याबाबत

**(१८) * १९८८० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकांची उपचारानंतर प्रतिपूर्ती करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रतिपूर्ती करण्यास बराच कालावधी लागत असल्याने महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी जन आरोग्य योजनेप्रमाणे वैद्यकीय भरपाई विमा योजना पध्दतीने (कॅशलेस पद्धतीने मेडिक्लेम) सुविधा पुरविण्याचे मागणी वेगवेगळ्या शासकीय कर्मचारी संघटना तसेच मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही शासकीय आस्थापनांनी वैद्यकीय भरपाई विमा योजना (कॅशलेस मेडिक्लेम) सुविधा सुरू केली असुन त्यान्वये शासकीय खर्चाची बचत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भरपाई विमा योजना पध्दतीने सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे, यासंदर्भात महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ आणि महाराष्ट्र राज्य कृतिशिल निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेने मागणी केलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यातील महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि केंद्राची आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना यांचे एकत्रिकरण करुन राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य संरक्षण रु.५.०० लाख एवढे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष मर्यादेपर्यंत नि:शुल्क (कॅशलेस) वैद्यकीय उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचा देखील समावेश आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया येथील भूजल साठ्यामध्ये युरेनियम घटकाचे अंश सापडल्याबाबत

**(१९) * १९०६८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया येथील भूजल साठ्यामध्ये युरेनियम किरणोत्सर्गाच्या घटकाचे अंश सापडल्याची माहिती केंद्रीय भूजल मंडळाच्या मध्यवर्ती सर्व्हेक्षणातून निदर्शनासआली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार राष्ट्रीय जलप्रस्तर नकाशे व व्यवस्थापन या विषयावर क्षेत्रिय कार्यशाळेचे आयोजन झाले असता संबंधित विभागाच्या शास्त्रज्ञांनी युरेनियमचा पाण्यामध्ये अंश सापडल्याने भविष्य काळामध्ये मानवी आरोग्य हानी होऊ शकते, असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे भविष्यामध्ये अशा प्रकारच्या सर्व्हेक्षणामधून मानवी आरोग्याला हानी करण्यासारख्या युरेनियम अथवा इतर अंश सापडल्यास त्याची खबरदारी घेण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) महाराष्ट्रातील भूजल निरीक्षण विहिरीमधून मान्सूनपूर्व हंगामात (मे, २०१९) विश्लेषण केलेल्या १०८५ नमुन्यांपैकी केवळ तीन नमुन्यांमध्ये भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील युरेनियमचे प्रमाण ३० पीपीबीपेक्षा जास्त आढळून आले आहे, हे खरे आहे.
(२) भारतीय मानक संस्था (BIS) चे मानक BIS १०५००:२०२१ अनुसार युरेनियम या घटकासाठी स्वीकार्य मर्यादा ही ३० ppb पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या मर्यादेत कोणतीही शिथिलता देण्यात आलेली नाही.

कोणत्याही पेयजल घटकाची मात्रा स्विकार्य मर्यादेपेक्षा जास्त असल्यास असे पाणी प्रक्रिया करुनच वापरले जावे, अशी सामान्यत: शिफारस करण्यात येते. भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील भूजलाची गुणवत्ता तपासण्यासाठी निश्चित केलेल्या काही विहिरीमध्ये युरेनियम घटकाची मात्रा ३० ppb पेक्षा जास्त आढळून आली आहे. अशा विहिरी Hotspot म्हणून निश्चित करण्यात आल्या असून वेळेनुसार त्यातील युरेनियम घटकाची मात्रा बदल होतो का हे बघण्यात येईल.
(३) भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्याच्या ज्या भागात युरेनियम घटकाचे प्रमाण BIS मर्यादेपेक्षा जास्त आढळून आले आहेत. त्या भागात केंद्रीय भूजल मंडळाकडून सविस्तर अभ्यास करण्यात येत आहे. शिवाय युरेनियम घटकांचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा किंचीत जास्त आढळून आले असल्याने त्यांचा मानवी आरोग्यास काही धोका उद्भवू शकतो वा नाही याचा अभ्यास करण्याकरिता शासनाकडून योग्य पावले उचलण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आटपाडी (जि.सांगली) येथील शासकीय महाविद्यालयाच्या वसतीगृहातील विद्यार्थी प्राथमिक व मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(२०) * १८८४७ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) येथील शासकीय महाविद्यालयात शिक्षण घेणारे सुमारे १९० विद्यार्थी तेथील वसतीगृहात वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर वसतीगृहाची संपूर्ण जबाबदारी श्री.आर.एल.गावडे या अधिकाऱ्याकडे असून वसतीगृहात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता स्वच्छतागृह, पाणी व गरम पाण्यासाठी हिटर (दोन नग) झोपण्यासाठी बेड तसेच पंखे असतांना यापैकी कोणतीही सुविधा वसतीगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येत नसल्याचे तसेच विद्यार्थ्यांना प्रात: विधीसाठी वा लघुशंकेसाठी बाहेर उघडया माळावर जावे लागत असल्याचे दि. १ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसतीगृह अधिकाऱ्याने सदर प्राथमिक व मुलभूत सुविधा वापरावर बंदी घातली असून जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांना सदर सुविधांपासून वंचित ठेवण्यात येत असल्याचेही त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतीगृहातील प्राथमिक सुविधांपासून जाणिवपूर्वक विद्यार्थ्यांना वंचित ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आटपाडी, जि. सांगली येथील वसतीगृहाची प्रवेश क्षमता ५० प्रशिक्षणार्थी असून सद्यस्थितीत २० प्रशिक्षणार्थी वास्तव्यास आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

उन्हाळयामध्ये पाणी टंचाईमुळे संस्थेचा पाणीपुरवठा काही प्रमाणात विस्कळीत झाल्याने व पाण्याचा टॅंकर उपलब्ध न झाल्याने काही विद्यार्थ्यांना काही वेळा प्रात: विधीसाठी बाहेर जावे लागल्याची शक्यता आहे. तथापि, सद्यस्थितीत वसतीगृहातील पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचे स्तरावर चौकशी समिती नेमून प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवालानुसार कोणीही दोषी आढळून आले नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.सफाळे (ता.जि.पालघर) येथे सुसज्ज ग्रामीण रूग्णालय उभारण्याबाबत

**(२१)** * **१९०२५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सफाळे (ता.जि.पालघर) पूर्व- पश्चिम भागातील ५०-६० छोटे मोठे गाव/पाडे यांचा समावेश असून लोकसंख्या सुमारे दीड लाखापेक्षा अधिक असल्याने तेथील ग्रामस्थांना आरोग्याच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सफाळे येथे सुसज्ज ग्रामीण रूग्णालय उभारावे अशी मागणी परिसर संघर्ष समितीने मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उपसंचालक सार्वजनिक आरोग्य विभाग, ठाणे इ. अन्य संबंधितांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाळे परिसरात ग्रामीण रूग्णालय नसल्यामुळे उपचारांअभावी अनेक रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत असून सफाळे येथे सुसज्ज ग्रामीण रूग्णालय उभारण्याची मागील तीन वर्षांपासून मागणी मागील तीन वर्षांपासून होत असून दिनांक ११ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यालयासमोर परिसर संघर्ष समितीने धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सफाळे येथे सुसज्ज ग्रामीण रूग्णलय उभारणीच्या मागणीसंदर्भात येथील ग्रामस्थांना सुरळीत आरोग्यसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

मौजे सफाळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सफाळे परिसरात ग्रामीण रुग्णालय नसल्यामुळे उपचारांअभावी अनेक रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत हे खरे नाही. सफाळे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.

(३) शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे भारत निर्माण योजनेंतर्गतच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * १९२८९ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १६५११ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे भारत निर्माण योजनेत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, मुक्ताई नगर यांनी केलेल्या चौकशीत रुपये १६,९२,०६८ एवढ्या रक्कमेची तफावत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिनांक २७ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांना चौकशी अहवालाप्रमाणे रुपये १६,९२,०६८ एवढी रक्कम संबंधित तांत्रिक सेवा पुरवठेदार तत्कालीन अध्यक्ष व सचिव व सर्व तत्कालीन ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती, चिखली (ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव) यांचेकडून वसूल करणेबाबत तसेच वसुलीस प्रतिसाद न मिळाल्यास आर आर सी किंवा फौजदारी कार्यवाही करण्याबाबत कळविले होते, हे खरे आहे काय,.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिनांक २१.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आर.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, इस्लामपुर सांगली यांना त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणेकामी नेमण्यात आले होते. मात्र सदर त्रयस्थ संस्थेबाबत संबंधित समिती सदस्य यांनी आक्षेप घेतल्याने त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, बेलापूर यांच्यामार्फत त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्याची परवानगी दिली आहे. सदरील यंत्रणेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय अनुदानित आयुर्वेद महाविद्यालय व युनानी महाविद्यालयातील हाऊसमन व क्लिनिकल रजिस्टार यांच्या वेतनात वाढ करण्याबाबत

**(२३) * १९२५४ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अनुदानित आयुर्वेद महाविद्यालय व युनानी महाविद्यालय येथे २४ तास सेवा देणाऱ्या हाऊसमन व क्लिनिकल रजिस्टार यांना गत ३० ते ३५ वर्षांपासून दरमाह रु. २४०० ते २८०० /- इतकेच तुटपुंजे वेतन दिले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर वेतन हे किमान वेतन कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन करणारे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने हाऊसमन व क्लिनिकल रजिस्टारांना शासकीय नियमाप्रमाणे वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यातील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयामध्ये व रुग्णालयामध्ये रुग्णांना चांगले उपचार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व रुग्णालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांप्रमाणेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील व रुग्णालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना निवासी योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना लागू केल्यानंतर, (१) आवासी वैद्य (२) प्रबंधक वैद्य (३) एम.डी. विद्यार्थी प्रथम ते तृतीय वर्ष यांचे पदनाम अनुक्रमे कनिष्ठ निवासी-१, कनिष्ठ निवासी-२, कनिष्ठ निवासी-३ यामध्ये रुपांतरीत करण्यात आले आहे. यांनुसार विद्यावेतनात वेळोवेळी वाढ करण्यात येते.

अनुदानित खाजगी महाविद्यालये व रुग्णालयांतील शासनमान्य पदांवरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १००% वेतन अनुदान देण्यात येते. तसेच, शासन अनुदानित संस्थामधील हाऊसमन व क्लिनिकल रजिस्टार यांना देण्यात येणारी रक्कम हे विद्यावेतन आहे. त्यामुळे किमान वेतन कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन होत आहे, असे म्हणता येत नाही.

-----------------

## मुंबई शहरामध्ये रक्त संक्रमण अधिकारी तसेच डॉक्टरांच्या अनुपस्थितीत भरविण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिरांवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(२४) * १८९५२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रक्तदान शिबिरांमध्ये रक्तदात्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी राज्य रक्त संक्रमण अधिकारी तसेच डॉक्टरांची उपस्थिती अनिवार्य असतानादेखील मुंबई शहरात सद्यस्थितीत घेण्यात येत असलेली काही रक्तसंकलन शिबिरे डॉक्टरांच्या उपस्थितीशिवाय घेतली जात असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुषंगाने मुंबईत रक्त संक्रमण अधिकारी तसेच डॉक्टरांच्या अनुपस्थितीत भरविण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा व त्याअंतर्गत अधिनियम १९४५ मधील परिशिष्ट एफ भाग १२ (बी) च्या तरतुदीनुसार रक्तकेंद्रा बाहेरील स्वैच्छिक रक्तदान शिबीरांसाठी रक्तदानापुर्वी रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी व रक्तदानानंतर रक्तदात्यास काही त्रास झाल्यास (adverse reaction) वैद्यकीय मदतीसाठी अर्हता प्राप्त वैद्यकीय अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने व सदर वर्तमान पत्रातील बातमीस अनुसरुन राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर्व रक्तकेंद्रांना डॉक्टरांच्या उपस्थितीतच रक्तदान शिबीरे घेण्यात यावीत असे निर्देश दिले आहेत. तसेच याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना शिबीराच्या ठिकाणी आकस्मिक अचानक भेटी देऊन वैद्यकीय अधिकाऱ्याच्या उपलब्धतेची खात्री करुन घेणेबाबत सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यांमधील ग्रामीण व शहरी भागातील पाणी टंचाईच्या समस्येचे निराकरण करण्याबाबत

**(२५) * १९६८० श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नवेदर नवगांव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ग्रामस्थांना पाणी पुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचे कार्यारंभ आदेश दि. २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले असून सदर काम मे. ओम साई कन्स्ट्रक्शन, रेवसगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) या ठेकेदाराकडून पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्ह्यात लोकसंख्येप्रमाणे पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्या असून मुंबई आणि बाहेरचे बांधकाम व्यावसायिक टोलेजंग इमारती उभारण्याकरिता सदर जिल्हयात जमिनी खरेदी करीत असून त्याकरिता जुन्या जलस्त्रोतातून पाणी पुरवठा होणार असल्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जत (जि. रायगड) येथील पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी पाड्यात ताडवाडी, मोरेवाडी या भागात जलजीवन मिशन नळ पाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याने पेयजलाची भीषण टंचाई निर्माण झाल्याबाबत 'समर्थन' संस्थेने मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), मा. मंत्री (ग्रामविकास), अपर मुख्य सचिव (ग्रामविकास व पंचायतराज), प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता

विभाग), जिल्हाधिकारी (रायगड) यांच्याकडे दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्र देऊन निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पेण आणि अलिबाग तालुक्यातील पाणी योजनांकडे शासनांच्या तसेच स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पेणमधील ९ गावे आणि ३० वाड्यांमधील १० हजार ५५८ नागरिकांना टँकरद्वारे पिण्यासाठी पाणी पुरविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हाशिवरे, सारळ, रेवस (ता.अलिबाग,जि.रायगड) या गावांमध्येही तीव्र पाणीटंचाई जाणवत असून अलिबाग शहराचा तसेच ग्रामीण भागाचा विस्तार होत असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पाणी पुरवठा, डम्पिंग ग्राऊंड तसेच ड्रेनेज सिस्टीम यासारख्या नागरी सुविधा पूर्ण करण्यासाठी शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पेणच्या खारेपाट विभागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नसून जवळपास आठ वर्षांपासून सदर योजना प्रलंबित असून पेण तालुक्यातील तुकाराम वाडी, मसद बुद्रुक, मसद बेडे, बोर्वे, निफाड वाडी, खरबाची वाडी, शिर्की या गावांमध्ये पाण्यासाठी टंचाई निर्माण झाली असून दरवर्षी साधारणपणे ५५० गावे आणि १००० वाड्यांना पाणीटंचाई जाणवत आहे तसेच रायगड जिल्ह्यात ९३८ कोटी रुपये खर्च करून राबविण्यात येत असलेल्या १ हजार ४४४ योजनांचाही लाभ होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्ह्यात नव्याने धरणे बांधण्याचे नियोजन करुन अस्तित्वात असणाऱ्या तलाव नद्यांमधील गाळ काढून उक्त जिल्ह्यातील जलजीवन मिशन व ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत अपूर्णावस्थेत असलेल्या योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत मंजूर करण्यात आलेल्या मौजे नवेदर नवगांव ( ता.अलिबाग, जि.रायगड) नळ पाणी पुरवठा योजनेचे काम ओम साई कन्स्ट्रक्शन, रेवसगांव (ता.अलिबाग, जि.रायगड) या ठेकेदाराकडून दिनांक ३१.१२.२०२० रोजी पूर्ण करुन सदर योजना दिनांक ३१.१२.२०२० रोजी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, नवेदर नवगांव, ता.अलिबाग यांना देखभाल दुरुस्तीकरिता हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अलिबाग तालुक्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत योजनांची अंदाजपत्रके तयार करतांना तालुक्यातील लोकसंख्या तसेच पर्यटन व इतर व्यवसाय संदर्भात येणाऱ्या फिरत्या लोकसंख्येचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तथापि, बाहेरच्या बांधकाम व्यवसायिकांकडून टोलेजंग इमारती उभारतांना त्यांचेमार्फत स्वतंत्र पाण्याचे उद्भव घेण्यात येत असल्यामुळे सदर व्यावसायिक जुन्या उद्भवावर अवलंबून नाही.

(३) अंशत: खरे आहे.

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील आदीवासी पाडयात ताडवाडी, मोरेवाडी या गावांना पाणी टंचाई निर्माण झाली असून टँकरव्दारे माहे, जून २०२३ अखेर पाणी पुरवठा करण्यात आला असून, मौजे ताडवाडी, मोरेवाडी, ता.कर्जत येथे जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत योजनेचे काम प्रगतीपथावर

असून ६०% काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे माहे, डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

समर्थन संस्थेच्या निवेदनानुसार योजनेच्या कामांना गती देऊन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश उपविभागीय स्तरावर देण्यात आले आहेत.

(४) पेण तालुक्यातील खारेपाट भागामध्ये पिण्यास योग्य अन्य कोणतेही उद्भव नसल्याने पाणी टंचाई निर्माण होते. सदर कालावधीमध्ये पेण तालुक्यात खारेपाट भागात प्रशासनामार्फत टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

तसेच अलिबाग तालुक्यात ०२ गावांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर दोन गावांकरीता जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे माहे डिसेंबर, २०२३ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत मौजे सारळ, रेवरा, हाशिवरे गावांमध्ये कामे करण्यात आली असून सदर कामांसाठी अनुदान प्राप्त करुन देण्यात आले आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी कंपोस्ट पिट, तिनचाकी बॅटरीवरील घंटागाडी इ. बाबींचा आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डे (सिंगल पिट), शोषखड्डे (सिंगल पिट) स्तरीकरण तळे इ. बाबींचा समावेश आहे.

(६) अंशत खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत वाढीव उद्भव शहापाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (ता.पेण, जि.रायगड) या योजनेची कामे पूर्ण झाली आहे. योजना माहे जानेवारी, २०२३ पासून चाचणी स्वरुपात कार्यान्वीत करुन खारेपाटातील योजनेत समाविष्ट ३८ गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

पेण तालुक्यातील २६ गावे व १४१ वाडया असे एकूण १६७ गांव / वाडयांना ग्रामस्थांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत १४ टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

रायगड जिल्हयातील सर्व तालुक्यांमधील ७४ गावे व २९० वाडया अशा एकूण ३६४ गांव / वाडयांना दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत ४७ टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत पुरेसे पर्जन्यमान झाल्याने टँकरव्दारे पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे.

(७) रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील खांडपे तलावाचा गाळ, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेतंर्गत काढण्यात आला आहे. तसेच, टंचाईग्रस्त गावातील स्त्रोत बळकटीकरण करणे, गाव तलाव, सुशोभिकरण करणे इ. कामे अमृत सरोवर, राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सदर कामे पूर्ण होताच गावपातळीवरील उद्भव स्त्रोताच्या पाणी पातळीत वाढ होणे अपेक्षित आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत सन २०२२-२३ मधील मंजूर योजना माहे मार्च, २०२४ अखेर पूर्ण करुन गावांना व वाडयांना ५५ LPCD प्रमाणे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## उधवा (ता.तलासरी, जि.पालघर) या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी आलेल्या लहान मुलीवर आरोग्य सेवकाने नशेत असताना उपचार केल्याबाबत

**(२६) * १९७५४ ॲड.अनिल परब, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उधवा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवासी डॉक्टर नसल्याने रात्री उपचारासाठी आलेल्या लहान मुलीवर आरोग्य सेवकाने मद्य पिऊन नशेत असताना उपचार केल्याप्रकरणी मद्यपी आरोपी सेवकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, आदिवासीबहुल पालघर जिल्ह्यात ग्रामीण भागात असलेली आरोग्य केंद्र आणि आरोग्य उपकेंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांचा तसेच त्यांच्यासोबत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने तसेच सदर प्रकरणी दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि. २६.०३.२०२३ रोजी डॉ. राजु रामु बारात (कंत्राटी वैद्यकीय अधिकारी) यांच्या आईची तब्येत बरी नसल्यामुळे ते सुट्टीवर असल्यामुळे पर्यायी डॉ. प्रमोद कोंढारी, समुदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) (NHM ) हजर होते व सोबत कंत्राटी स्टाफ नर्स (पु) श्री.राकेश प्रभाकर आढाव हे मद्य प्राशन करुन सेवेत हजर होते, त्यामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी यांची संख्या पुरेशी असून उपकेंद्र स्तरावर पालघर जिल्हयात कंत्राटी पदभरती झाली असून कर्मचाऱ्यांचा मोठया प्रमाणात अभाव नाही.

(३) यासंदर्भात तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये श्री. राकेश आढाव, स्टाफ नर्स( पु.) हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच या प्रकारच्या घटना घडू नये याकरिता सर्व कर्मचाऱ्यांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अमरावती येथे रक्तपेढी सुरु करणेबाबत

**(२७) * १९४०६ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अमरावती येथे सन २०१५ पासून रक्तपेढी मंजुर असुनही अद्यापही रक्तपेढी सुरु झाली नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमितरित्या डायलिसीस व शस्त्रक्रिया करताना गरीब रग्णांना बाहेरून रक्ताची वेळेवर व्यवस्था करावी लागते, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अमरावती जिल्ह्यातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील मंजूर असलेली रक्तपेढी तातडीने सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अमरावती येथे नियमितरित्या डायलिसीस व गरीब रुग्णांना रक्ताची वेळेवर गरज भासल्यास सामान्य रुग्णालय, अमरावती येथे स्थापित असलेल्या रक्तपेढी विभागातून उपलब्ध साठयातून रक्ताची गरज भागविली जाते.

(३) शासन निर्णय दि. ०४.०७.२०२३ अन्वये सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अमरावती येथील रक्तपेढी करिता लागणारे वैद्यकिय उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.हिरडी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथे ग्रामपंचायतीच्या विहिरीच्या खोदकामादरम्यान जिलेटीनचा स्फोट होऊन कामगार मृत्युमुखी पडल्याबाबत

**(२८) * २००४३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.हिरडी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथे ग्रामपंचायत विहिरीचे खोदकाम काम सुरु असताना जिलेटीनचा स्फोट होऊन तीन कामगार जागीच मृत्युमुखी पडले असून एक जण जखमी झाल्याची बाब दि.१९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामपंचायत विहिरीचे खोदकाम करण्याची ग्रामपंचायतीने अनुमती दिली नसल्यामुळे वर्कऑर्डर काढण्यातच आली नसून सदर कामाच्या ठेकेदाराबाबत माहिती अवगत नसल्याचे गटविकास अधिकारी यांनी उक्त घटनेनंतर खुलासा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पोलीस तपासासह विभागांर्तगत चौकशी केली आहे काय, त्यानुसार पोलीस तपासात व विभागांर्तगत करण्यात आलेल्या चौकशीत काय निदर्शनास आले, तसेच संबंधित ठेकेदार यांच्यावर कारवाई होण्याच्या दृष्टीने तसेच मृत कामगारांच्या नातेवाईकांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कार्यारंभ आदेश देण्यात आले नसताना संबंधित ठेकेदाराने विहीरीचे काम सुरू केले असल्यामुळे सदर दूर्घटना घडल्यानंतर हिरडी, ता. त्रंबकेश्वर येथील ग्रामसेविका श्रीमती आशा भागवत जाधव यांच्या फिर्यादीवरून पोलिस स्टेशन हरसूल येथे भा.दं.वि. कलम ३०४, २८६ सह एक्सप्लोजिव्ह सबस्टन्सेस ॲक्ट १९०८ चे कलम ३ व ४ प्रमाणे दि. २०/०४/२०२३ रोजी गु.र.नं. ७९/२०२३ नुसार संबंधित व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भभवत नाही.

-----------------

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील पदांचे पदोन्नतीचे धोरण सुधारित करुन उक्त पदांकरिता नवीन सेवाप्रवेश नियम लागू करणेबाबत

**(२९) * २०१९२ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील प्राचार्य वर्ग - २ (तांत्रिक) पदांचे अन्यायकारक पद्धतीने होत असलेले पदोन्नती धोरण सुधारित करणेबाबत महाराष्ट्र राज्य आय. टी. आय. निदेशक संघटनेच्या गत वीस वर्षांपासून होत असलेल्या मागणीस अनुसरून नवीन सुधारित सेवाप्रवेश नियम मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील वर्ग -१, वर्ग-२ (तांत्रिक) व वर्ग - ३ ( शिक्षकीय संवर्ग) मधील पदांचे सुधारित सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निदेशक संघटनेने शासकीय आय. टी. आय. मधील पदांच्या माहे एप्रिल, २०२२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आणले असून सदर त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक/ व्यवसाय निदेशक या पदांना शासन अधिसूचना दिनांक १८ नोव्हेंबर, १९८३ अन्वये मंजूर सेवाप्रवेश नियम लागू असून सदर प्रवेश नियमात कालानुरुप बदल करणे आवश्यक असल्याने सदर सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील वर्ग -१, वर्ग-२ (तांत्रिक) व वर्ग - ३ ( शिक्षकीय संवर्ग) पदांचे पदोन्नतीचे धोरण सुधारित करुन नविन सेवाप्रवेश नियम लागू करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील गट-अ (तांत्रिक), गट- ब (तांत्रिक) व गट-क (तांत्रिक) या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) महाराष्ट्र राज्य आय. टी. आय. निदेशक संघटनेने दि.०६/१२/०२२ रोजी आकृतीबंधामध्ये त्रुटी असल्याबाबतचे निवेदन सादर केले आहे. त्याअनुषंगाने संचालनालय स्तरावर दि.३०/१२/२०२२ रोजी बैठक घेण्यात आली आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील पदांचा आकृतीबंध वित्त विभागाच्या दि.२९/०६/२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या सूचनांनुसार तयार करण्यात आला असून, त्यास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षेतखालील उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार या विभागाच्या शासन निर्णय दि.०७/०४/२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये पूर्वीच्या कंत्राटी पदांऐवजी सदर पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच डी. जी. टी., नवी दिल्ली यांनी इंजिनिअरींग ड्रॉईंग ॲन्ड मॅथ या विषयाच्या तासिका कमी केल्याने पदाचा कार्यभार विचारात घेऊन आकृतीबंधात गणित निदेशक व चित्रकला निदेशक पदाऐवजी गणित

तथा चित्रकला निदेशक हे पद मंजूर करण्यात आले आहे. या सर्व बाबी बैठकीमध्ये संघटनेच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत.
(४) हे खरे आहे.
(५) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील गट-अ (तांत्रिक), गट- ब (तांत्रिक) व गट-क (तांत्रिक) या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## जिते ( ता.पेण, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दुय्यम प्रतीच्या व भेसळयुक्त एम.आर. (गोबर व रुबेला) लसीमुळे लहान मुलांना बाधा झाल्याबाबत

**(३०) * २०६४७ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिते (ता.पेण,जि.रायगड) प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक ०१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आलेल्या दुय्यम प्रतीच्या व भेसळयुक्त एम.आर. (गोबर व रुबेला) लसीमुळे पाच लहान मुलांच्या हातावर काही दिवसांतच जखमा झाल्याने शस्त्रक्रिया करावी लागल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लहान मुलांच्या लसीकरण प्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व संबंधित यंत्रणांवर कोणती कारवाई करण्यात आली आणि तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
दि. ०१ मे, २०२३ रोजी उपकेंद्र जिते येथील लसीकरण सत्रातील ८ मुलांना गोवर रुबेला लस देण्यात आली. त्यापैकी ५ मुलांना लसीकरण केलेल्या जागेच्या ठिकाणी संसर्ग झाल्याचे दि. २९ मे ते १२ जून, २०२३ या कालावधीत निदर्शनास आले व त्या सर्वांना उपचार देण्यात आले आहेत. लसीकरणासाठी वापरण्यात आलेली गोवर रुबेलाची लस दुय्यम प्रतीची व भेसळयुक्त नव्हती.
(२) जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, रायगड व उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे मंडळ यांच्या कार्यालयाकडून सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.
जिल्हा AEFI समितीने Redness & Swelling चे कारण कदाचित संसर्ग (infection) असू शकते, असे मत व्यक्त केले आहे. सदर समितीने अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी मार्गदर्शक सूचनांनुसार लसीकरण सत्र आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांघर (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) गावात जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) * १९९९२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांघर (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) हे गाव शासनाने "मधाचे गाव" म्हणून जाहिर केले असून सदर डोंगराळ भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मांघर ह्या गावात पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत असून महाबळेश्वर ते सदर मधाचे गावालगतचा अवघ्या ८ कि.मी. रस्त्याच्या विकासाकडे शासनाने दुर्लक्ष होत असल्याने गावातील नागरिकांना व पर्यटकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही, मांघर (ता. महाबळेश्वर, जि.सातारा) ह्या गावात जाणारा रस्ता डांबरी पृष्ठ भागाचा असुन सुस्थितीत आहे.
(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

----------------

## नंदुरबार जिल्हा परिषदेच्या विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२)** * **२०५२१ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा परिषदेच्या वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील ७५५९ मंजूर पदांपैकी ६१४१ पदे भरलेली असून १४१८ पदे रिक्त आहेत. त्यात प्रामुख्याने आरोग्य सेवक ४१०, प्राथमिक शिक्षक ५०९, महिला व बाल कल्याण विभागातील पर्यवेक्षिका ३० व ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ३० अशी पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आरोग्य आणि शेतीशी निगडित समस्या उद्भवत असून सदर दुर्गम भागात रस्त्यांची सुविधा नसल्याने जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी समस्या निर्माण होत आहेत. तसेच सदर जिल्हा परिषदेत एका अधिकाऱ्याकडे दोन ते तीन विभागांच्या अतिरिक्त कार्यभार सोपविला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्हा परिषदेतील रिक्त पदे तातडीने भरून जिल्ह्याचा अनुशेष भरून काढण्याच्यादृष्टीने तसेच सदर दुर्गम भागात रस्त्याची सोय करुन दळणवळणाच्या सुविधा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेत एक अधिकारी दोन ते तीन विभागांच्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत ही बाब अंशत: खरी आहे. सद्यस्थितीत जिल्ह्याच्या दुर्गम भागातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग सुस्थितीत असून सदर रस्त्यांवर वाहतूक सुरळीत सुरू आहे. दुर्गम भागातील रस्त्यांच्या कामाची दुरूस्ती व सुधारणा वेळोवेळी करण्यात येत असून जिल्हा वार्षिक योजना तसेच रस्ते विशेष दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत रस्त्यांच्या सुधारणा होत असतात.

(३) जिल्हा परिषद अंतर्गत गट-क संवर्गातील आरोग्य विभागाशी संबंधित व इतर संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येत आहे. सरळसेवा पदभरती करीता असलेल्या गट-क च्या संवर्गांकरीता सुधारीत प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने दि.९.५.२०२३ व दि.१५.५.२०२३ अन्वये शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आली आहेत. तसेच दि.१५.५.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये भरती प्रक्रिया राबवितांना सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकसूत्रता असावी याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ग्रामविकास विभागामार्फत भरती प्रक्रियेवर सनियंत्रण केले जात आहे. यासंदर्भात मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे अध्यक्षतेखाली क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व आय.बी.पी.एस. कंपनीचे अधिकारी यांचेसमवेत व्ही.सी.व्दारे आढावा घेण्यात येत आहे.

जिल्ह्यातील दुर्गम भागातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग वगळता डोंगराळ भागात विखुरलेल्या लोकवस्ती जोडण्यासाठी वाडे पाडे जोडरस्त्यांची कामे आदिवासी विकास विभागाकडील बिरसा मुंडा रस्ते जोड योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आली आहेत. तसेच जिल्ह्यातील ११६१ जोड रस्ते दर्जोन्नतीसाठी प्रस्तावित आहेत. सदर कामांना मंजूरी मिळाल्यानंतर दुर्गम भागातील शेतकऱ्यांना मालाच्या वाहतूकीसाठी, विद्यार्थ्यांना शाळा व आश्रमशाळा येथे जाण्यासाठी व ग्रामस्थांना दळणवळण आणि प्राथमिक आरोग्य केंद्र/ उपकेंद्र येथे जाण्यासाठी सोईचे होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा शासकिय रुग्णालय, रायगड येथे कायमस्वरुपी स्त्रीरोग तज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत

**(३३) * २०२३९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शासकीय रुग्णालय, रायगड येथे स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे आठ महिन्यांची गरोदर महिला श्रीमती जागृती सुनील कातकरी यांचे बाळ दगावले गेल्याचे तसेच सद्य:स्थितीत रुग्णालयात निवृत स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून त्यानुसार या प्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने तसेच स्त्रीरोग तज्ज्ञांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २२-०३-२०२३ रोजी सायंकाळी ५.३३ वा. सौ.जागृती सुनिल कातकरी, वय-२४ वर्षे ही गरोदर महिला प्रसुतीसाठी आंतररुग्ण म्हणून दाखल झाली होती. सदर रुग्णास सायंकाळी ६-०० वा. डॉ.जॉयती पांजा, स्त्रीरोग तज्ञ, शासकीय महाविद्यालय, अलिबाग यांनी सदर महिलेची तपासणी केली होती. त्यावेळी सदर रुग्णाचे बाळ हे रुग्णालयात दाखल होण्यापुर्वीच दगावले असल्याची माहिती रुग्णास दिलेली आहे. त्यावेळी सदरील महिलेने तिच्या पोटातील बाळाची हालचाल ही दोन दिवसापासून बंद झाल्याचे सांगितले त्यामुळे अपघात विभागातील कर्तव्यावरील वैद्यकीय अधिका-यांनी सदर महिलेस पुढील उपचारार्थ सर ज.जी.समुह रुग्णालय, मुंबई येथे संदर्भित केले होते.

तथापि, सदर रुग्ण गरीब असल्याने ते पुढे जावू शकत नसल्याने पत्रकार श्री.भोस्तेकर यांनी एन.एच.एम. अंतर्गत कार्यरत असलेले ऑनकॉल स्त्रीरोगतज्ञ डॉ. अनिल फुटाणे यांना कॉल करुन उपचार करण्यास विनंती केल्याने सदरील गरोदर महिलेची तपासणी केली व बाळ पोटातच दगावलेले असल्याने मातेचा जीव वाचविणेसाठी प्रसुती केली व माता सुखरुप आहे.

(२) दिनांक २४.०३.२०२३ रोजी दै. लोकमत वृत्तपत्रामध्ये "डॉक्टरांअभावी गरोदर मातेला गमवावे लागले बाळ" या मथळ्याखाली प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालानुसार सदर महिला रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वीच बाळ पोटातच दगावले असल्यामुळे डॉक्टरांअभावी गरोदर मातेला बाळ गमवावे लागले हे म्हणणे संयुक्तिक नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये मूलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३४)** * **१९४९९ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) तारापूर औद्योगिक वसाहत (जि.पालघर) येथे रासायनिक कारखान्यांसह टेक्स्टाईल आणि पोलाद निर्मिती करणारे कारखाने असून या औद्योगिक वसाहतीत मूलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याची संख्या अधिक असून कारखान्यातील सुरक्षेच्या उपायांकडे होत असलेल्या दुर्लक्षांमुळे कंपन्यांमध्ये झालेल्या स्फोटाच्या घटनांमध्ये शेकडो कामगारांना जीव गमवावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तारापूर औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये अपघात झाल्यास जखमी कामगारांना उपचारासाठी मुंबई किंवा गुजरात राज्यातील रुग्णालयात न्यावे लागते, त्यामुळे बोईसर परिसरात सोयीसुविधांनीयुक्त असे रुग्णालय सुरू करण्याची मागणी एमआयडीसीतील स्थानिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी बोईसर परिसरात सोयीसुविधांनीयुक्त असे रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक व्यापारी, निवासी व पीएपी इत्यादी वापराकरिता एकूण २१०६ इतके भूखंड विकसित केले आहेत. एमआयडीसीमार्फत (MIDC) तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये अंतर्गत डांबरी रस्ते, पाणी पुरवठा योजना, सांडपाणी संकलन व नि:सारण योजना, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, पथदिवे, सामाईक सुविधा केंद्र, अग्निशमन केंद्र, टपाल कार्यालय, पोलिस स्थानक, इस्पितळ इत्यादी आवश्यक मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. सदर औद्योगिक क्षेत्र हे राष्ट्रीय महामार्गापासून १६.५० कि.मी. अंतरावर असून, महामंडळातर्फे सदर पोहोच रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आले आहे.

(२) पालघर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये तारापूर औद्योगिक वसाहत असून तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये अतिधोकादायक, धोकादायक व रासायनिक मिळून एकूण ५२४ कारखाने नोंदणीकृत आहेत. मागील ३ वर्षांमध्ये २२ कारखान्यांमध्ये अपघात होवून २५ कामगारांचा मृत्यू झालेला आहे. वरील अपघातांच्या चौकशी दरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने आढळून आलेल्या भंगांकरिता कारखाना व्यवस्थापनाविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. वरील कारखान्यांमध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत कामगारांचे प्रशिक्षण व रंगीत तालिमींचे आयोजन करुन औद्योगिक सुरक्षाविषयी जागरुकता करण्याचे काम सुरु असते.

(३) होय, हे खरे आहे.

बोईसर परिसरात सोयी सुविधांनीयुक्त असे रूग्णालय सुरू करण्याची मागणी स्थनिक लोकप्रतिनिधी, कामगार/कामगार संघटना व उद्योजक यांचेकडून करण्यात आली आहे.

(४) कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ESIC) दि.१८ व १९ जून, २०२२ रोजी झालेल्या १८८ व्या बैठकीत पालघर येथे १५० खाटांचे नविन ESIC रुग्णालय स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. तद्नंतर दि.२२.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्य विमा महामंडळाने ESIC रुग्णालयाकरीता देऊ केलेली गट क्र.१७७५/५७ मौ.कुंभवली, ता. जि. पालघर येथील ५ एकर जमीन मोफत व नाममात्र शुल्क आकारुन देण्याची विनंती जिल्हाधिकारी, पालघर यांना केली आहे.

त्यास अनुसरुन दि. १३.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कर्मचारी राज्य विमा महामंडळ मुख्यालय, दिल्ली यांच्या आदेशास अनुसरुन सदर ५ एकर जमिनीची आखणी करुन देण्याची विनंती प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना केली आहे. सद्य:स्थितीत रुग्णालय बांधकाम संबंधीची पुढील उचित कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथील वळगावातील वर्धमान कम्पाऊंडमध्ये इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३५) * १९६६६ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील वळगावातील वर्धमान कम्पाऊंडमध्ये ९ वर्षे जुनी असलेली तीन मजली इमारत कोसळून त्यामध्ये ८ व्यक्तींचा मृत्यू आणि ९ व्यक्ती जखमी झाल्या असून सदर बांधकाम करणाऱ्या विकासकास अटक करण्यात आली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचा पहिला मजला संबंधित बिल्डरने एका खाजगी कंपनीला गोडाऊनसाठी भाड्याने दिला होता व तेथे दहा टन सामान भरून ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास,सदर इमारतीवर बेकायदेशीर मोबाईल टॉवर उभारण्यात आला होता तसेच भिवंडीमध्ये सर्व नियमांचे उल्लंघन करून गोडाऊन उभी राहत असल्याने त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन सतत होणाऱ्या अपघातास तसेच या दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर अपघातात मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदरच्या अपघात प्रकरणी जबाबदार मिळकत धारक श्री.इंद्रपाल गुरुनाथ पाटील यांचेविरुध्द नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी, जि. ठाणे येथे दि.३०.०४.२०२३ रोजी भा.द.वि सं. चे कलम ३०४(२), ३३८, ३३७, ४२७,३४ अन्वये गु.र.क्र.३७८/२०२३ दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. अशा घटना घडू नये म्हणुन भिवंडी गटातील सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या हद्दीतील गोदामे व कंपन्या यांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेणे संदर्भात संबंधित मिळकत धारकास कळवून तसा अहवाल ग्रामपंचायत दप्तरी ठेवण्यात यावा व धोकादायक इमारती निष्कासीत करणेसंदर्भात आवश्यक कारवाई करावी यासंदर्भात गट विकास अधिकारी, भिवंडी यांनी दि. ०४/०५/२०२३ अन्वये सूचना दिल्या आहेत.

(४) सदर इमारत दुर्घटनमध्ये मृत पावलेल्या एकुण ०८ व्यक्तींच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून एक विशेष बाब म्हणून प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात आले आहे. तसेच सदर दुर्घटनेत किरकोळ जखमी झालेल्या १० व्यक्तींवर इंदिरा गांधी मेमोरीयल रुग्णालय, भिवंडी येथे प्रथमोपचार करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हा तेथे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ह्या शासनाच्या संकल्पनेची सर्व जिल्ह्यांत अंमलबजावणी करणेबाबत

**(३६) * १८८४३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १०७०२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा तेथे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ही शासनाची संकल्पना असून जालना, हिंगोली, पालघर, गडचिरोली, भंडारा, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, अंबरनाथ, अहमदनगर, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड, सातारा, अमरावती व परभणी या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय व त्याला संलग्नित ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्यासाठी माहे, फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्त कार्यालयाने सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैद्यकीय महाविद्यालयासाठी १५७७४ मनुष्यबळ उपलब्ध होणार असल्याने विविध जिल्ह्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास बुलढाणा जिल्ह्यातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच रुग्णांना सोयीचे व्हावे यासाठी बुलढाणा शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून वारंवार केली जात असून जालना व हिंगोलीसह इतर ठिकाणच्या ११ वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा निश्चिती झाली असून त्यासाठी सुमारे ५३३५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून पद निर्मितीसाठी शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, राज्यात उपरोक्त जिल्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता निधीची उपलब्धता, जागेची निवड व इतर तांत्रिक बाबींबाबत मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्यासमवेत दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्हयांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

(२) हे खरे आहे.

प्रत्येक नवीन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी १४३४ इतकी पदनिर्मिती केली जाणार आहे.

(३) अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या ९ जिल्हयांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास तसेच आवश्यक पदनिर्मिती करण्यास व पदे भरण्यास दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

जालना जिल्हा व इतर सहा जिल्हयांमध्ये नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे.

सदर महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांसाठी अंदाजे रु. ४३६५.७२ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

(४) आशियाई विकास बँक तसेच जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी अशा आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून वित्त विभागाच्या सहमतीने अर्थसहाय्य/कर्ज उपलब्ध करुन घेण्यास दि.२८.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३७) * १९३७४ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांचे श्रेणीवर्धन करुन जिल्हा रुग्णालयाच्या धर्तीवर ४०० खाटांचे करण्याचा प्रस्ताव सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आरोग्य विभागाने शासनाकडे पाठवूनही अद्याप मंजूरी दिली नसल्याचे दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धन प्रस्तावास तातडीने मान्यता मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) १०० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय, हिंगणघाट, जि. वर्धा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या दर्जात वाढ करुन ४०० खाटांचे जिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भभवत नाही.

-----------------

## अनुसूचित जातीतून धर्मांतरित बौध्द नागरिकांच्या पाल्यांच्या शाळेच्या दाखल्यावर धर्म व जातीचा उल्लेख करण्याची सक्ती केल्याबाबत

**(३८) * १९९४६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धर्मांतरीत बौध्दांना त्यांच्या पाल्यांचे बालवाडी/ पहिल्या वर्गात पाल्यांचे प्रवेश किंवा नांव नोंदणी करताना विशेषत: अनुसूचित जातीतून धर्मांतरित बौध्द पालकांनी सांगितलेल्या धर्माचे नाव धर्माच्या रकान्यात व अनुसूचित जातीचे नाव जातीच्या रकान्यात नोंद करण्याबाबत सर्व शासकीय, अनुदानित, विना अनुदानित शाळांच्या मुख्याध्यापकांना सूचना देण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाने दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाचा सदर निर्णय हा प्रामुख्याने अनुसूचित जातीतील धर्मांतरीत बौध्द पालकांसाठीच असल्याने व शाळेमध्ये पालकांनी त्यांच्या मुलाची जात कोणती नमूद करावी असा प्रश्न निर्माण झाल्याने शाळेच्या दाखल्यावर धर्मांचा,जातीचा उल्लेख करण्याची सक्ती करणे समर्थनीय नसल्याने पालकांनी त्याबाबत शासनाकडे विरोध दर्शविला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पालकांचा विरोध लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाने घटना (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा १९९०, दि.०३/०६/१९९० अन्वये घटना (अनुसूचित जाती) आदेश १९५० मध्ये सुधारणा करून अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश बौद्ध धर्मियांनाही लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार अनुसूचीत जातीची यादी हिंदू, शिख आणि बौद्ध धर्मियांनाही लागू झालेली आहे. सबब, अनुसूचित जातीमधून बौद्ध धर्मात धर्मांतर केलेल्यांना अनुसूचित जातीचे समजण्याबाबत दि.०८/११/१९९० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २२/०१/२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये दिलेल्या सूचना दिनांक १९/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये या विभागाने सर्व जिल्हा परिषदांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत. याप्रकरणी ग्राम विकास विभागाने कोणताही वेगळा धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील परळी (ता.वाडा) येथील ग्रामीण रुग्णालयासह नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याबाबत

**(३९) * १९५६१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी ग्रामीण रुग्णालय (ता. वाडा, जि.पालघर) या ग्रामीण रुग्णालयासह नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात होण्याबाबतचे प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयात व आरोग्य केंद्रात प्रतिदिन उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने सदर आरोग्य केंद्रावर अधिक प्रमाणात ताण पडत असून औषधे तसेच अन्य सेवांवर याचा परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयासह नऊ आरोग्य केंद्रांचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) दिनांक ०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजे परळी ता.वाडा, जि. पालघर येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयांच्या स्थापनेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसचे उर्वरित नऊ आरोग्य केंद्रांचे उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करमाळा ( जि. सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(४०) * १९९५३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि. सोलापूर) येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयास नव्याने १०० खाटांची मान्यता मिळालेली असून सदर रुग्णालयात सोनोग्राफी मशीन तज्ञांचा, बालरोग उपचारांच्या सुविधा व साहित्याचा अभाव असून येथील भुलतज्ञ डॉक्टर गत दीड वर्षापासून अनुपस्थित असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात दाखल करुन घेतलेल्या रुग्णांना डॉक्टर कर्तव्यावर नसल्यास मोबाईलवरुन सल्ला देऊन नर्सेसमार्फत इंजेक्शन आणि इतर उपचार करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने करमाळा उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करुन तातडीने योग्य वैद्यकीय सेवा, सुविधा मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, करमाळा जिल्हा सोलापूर येथे सोनोग्राफी मशिन प्राप्त झालेले असून माहे मे, २०२३ रोजी पासून सदर मशिन कार्यान्वित करण्यात आलेली असून सदरच्या कामकाजाकरीता ऑन कॉल भुलतज्ञाची नियुक्ती देण्यात आली आहे.
(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत ६६ पाणी पुरवठा योजनांची कामे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत

**(४१)** * **१९९५५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने मंजूर कार्यारंभ आदेश दिलेल्या १२२२ योजनांपैकी अद्यापही ६६ योजनांच्या कामांना सुरवात झाली नसून सदर योजनांसाठी निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ असताना अद्यापही ६६ योजनांची कामे सुरू झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जल जीवन मिशन योजनेतंर्गत कामांना वन, जलसंधारण, जलसंपदा विभागामुळे उद्भवणाऱ्या समस्यांचे संबंधित विभागाकडे स्थानिकांच्या मदतीने जिल्हा परिषद स्तरावरून पाठपुरावा करण्याचा दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर ६६ योजना सुरू होण्यास प्रामुख्याने वनविभागाकडून जलस्त्रोतासाठी अथवा जलवाहिनी टाकण्यासाठी ना हरकत दाखला अद्याप प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गाव अंतर्गत अडचणी दूर करून प्रलंबित योजना तात्काळ सुरू करण्याचे कार्यारंभ आदेशावेळी काही योजनांचा खर्च वाढला असल्याची बाब निदर्शनास आली असून त्यासाठी वाढीव खर्चासह असलेला सुधारित प्रस्ताव दाखल करुन मान्यता घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली,
(५) असल्यास, जलजीवन मिशनची रुपये १४१० कोटींची कामे वर्षभरात पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पूर्णवेळ कार्यकारी अभियंता नसल्यामुळे सदर योजनांची कामे प्रलंबित आहेत , हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जल जीवन मिशन अंतर्गत नाशिक जिल्ह्यात ६६ पाणीपुरवठा योजना जलदगतीने तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) होय हे खरे आहे.

सद्य:स्थितीत नाशिक जिल्हा परिषदेच्या २६ योजना ह्या वन विभागाची, जलसंपदा विभागाची जागा उपलब्धतेअभावी सुरु झालेल्या नसून, त्याबाबत संबंधित विभागांकडून जागा उपलब्धतेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) सद्य:स्थितीत वन विभागाकडे १० योजनांचे प्रस्ताव प्रलंबित असून, इतर योजनांच्या प्रस्तावांना वन विभागाची परवानगी मिळालेली आहे.
(४) ज्या योजनांना वाढीव उपांगे अथवा उद्भवास पाण्याची आवक कमी आहेत अशा ठिकाणी नवीन उद्भव प्रस्तावित करुन सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) हे खरे नाही.

पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यासाठी पुर्णवेळ कार्यकारी अभियंता उपलब्ध नाही. परंतु, पुर्णवेळ कार्यकारी अभियंता उपलब्ध नसल्यामुळे पाणी पुरवठा योजनांची कामे प्रलंबित नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील पालघर जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत "हर घर नल से जल" या महत्वाकांक्षी योजनेची प्रभावीपणे अंमलबाजवणी करणेबाबत

**(४२) * १९०२३ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत "हर घर नल से जल" या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून आबिटघरसह (ता.वाडा,जि.पालघर) १७ गावांसाठी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेसाठी २५७०.११ लक्ष रुपयांच्या अंदाजित खर्चास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास सदरहू योजनेचे स्वरूप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, वाडा तालुक्यातील (जि. पालघर) अतिदुर्गम भाग म्हणून ओळखल्या जात असलेल्या ओगदा आणि आखाडा परिसरातील ८ ते १० पाड्यांमधील आदिवासी जनतेला केवळ दोन कि.मी.वर मुंबईला पाणीपुरवठा करणारे मोडकसागर धरण असतानाही भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याची बाब दिनांक १३ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन अंतर्गत "हर घर नल से जल" या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व जिल्ह्यांसह विशेषत: वाडा तालुक्यातील (जि.पालघर) ओगदा आणि आखाडा परिसरातील ८ ते १० आदिवासी पाड्यांमधील पाणी टंचाई दूर करुन तेथील नागरिकांना पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

अबिटघर व १७ गावे (ता.वाडा, जि.पालघर) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रुपये २५७०.११ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास व आराखडयास दिनांक ०२.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) गांध्रे गावाजवळील वैतरणा नदीवरील बंधारा हा उद्भव घेऊन अबिटघर व १७ गावे ही योजना तयार करण्यात आली आहे. सदर योजनेचे कार्यादेश दिनांक ३०.०६.२०२२ रोजी देण्यात आले असून, सद्य:स्थितीत योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजनेतून ५५ लिटर प्रति दिन प्रति व्यक्ती पाणी देणे प्रस्तावित आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

वाडा तालुक्यात जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ०१ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व १३९ स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

वाडा तालुक्यातील मौजे ओगदा व आखाडा ही गावे डोंगराळ भागात असून, अप्पर वैतरणा पाणलोट क्षेत्रालगत आहेत. मौजे ओगदा ग्रामपंचायती अंतर्गत मौजे ओगदा, पाचघर, खोडदे व तिळमाळ या चार गावांसाठी आणि मौजे आखाडा ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांची कामे प्रगतीपथावर असून, योजना माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे.

तथापि, टंचाई काळात दिनांक १४.०४.२०२३ ते दिनांक २८.०६.२०२३ पर्यंत ओगदा ग्रामपंचायती अंतर्गत सागमाळ, टोकरपाडा, दिवेपाडा, कोरडेपाडा व जांभुपाडा या गांव / पाड्यांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला होता. सदर वाडयांचा समावेश योजनेत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी योजनेत विविध आजारांचा समावेश करणेबाबत**

**(४३) * २०११८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जळगाव जिल्ह्यात गर्भ पिशवीचे आजार, अपेंडिक्स, बाळंतपणातील शस्त्रक्रिया, पित्ताशयाचा खडा, हार्निया, हायड्रोसील यासारख्या दुर्धर आजारांनी पिडीत रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून सदर आजारांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी योजनेच्या यादीत नसल्यामुळे गरजू लाभार्थी रुग्ण उपचारांपासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजातील दुर्बल घटकांना, गरजू लाभार्थी रुग्णांना लाभ मिळवून देण्यासाठी वरील सर्व आजारांचा सदर योजनेत समावेश करावा ही मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ मे २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महात्मा ज्योतिराव फुले जीवनदायी योजनेत सदर सर्व आजारांचा समावेश करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

या सर्व आजारांचा महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये समावेश आहे. बाळंतपणातील शस्त्रक्रिया वगळता हे आजार दुर्धर नसून प्राथमिक स्वरुपाचे असल्यामुळे त्यांना शासकीय रुग्णालयांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

(२) याबाबतचे दिनांक २५ मे, २०२३ रोजी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील खारघरमध्ये रक्त संक्रमण परिषद केंद्र सुरु करण्याबाबत

**(४४) * २०३३४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना सुरक्षित रक्ताचा मुबलक पुरवठा वाजवी दरात उपलब्ध व्हावा तसेच रक्त संक्रमण सेवेत असलेल्या मनुष्यबळाचा तुटवडा लक्षात घेऊन कुशल मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्यांचे संसाधनविकासाद्वारे बळकटीकरण करण्यासाठी , राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या दिनांक २ नोव्हेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या १७ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत खारघर, नवी मुंबई येथे प्रशिक्षण केंद्र व त्यास संलग्न रक्तपेढी उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील रक्तपेढ्यांमधील डॉक्टर, तंत्रज्ञ, स्टाफ, नर्स यांना रक्तदान शिबिर तसेच प्रशिक्षणासाठी खारघर सेक्टर २० प्लॉट नंबर १४ अ या ठिकाणी रुपये सहा कोटी एवढी रक्कम खर्च करून राज्यातील पहिली रक्त संक्रमण परिषद केंद्राची पाच मजली स्वतंत्र इमारत उभारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर इमारतीचे काम दोन वर्षांपूर्वीच पूर्ण झालेले असून शासनाच्या व आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे रक्त संक्रमण केंद्र सुरू होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संक्रमण केंद्राची इमारत सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.
(४) सदर इमारतीचे बांधकाम सिडकोमार्फत करुन घेण्यात आलेले आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारतीचा ताबा दिनांक ०१.१२.२०२१ रोजी सिडकोने राज्य रक्त संक्रमण परिषदेस दिला आहे. त्यानंतर पायाभूत सुविधा विकास, राष्ट्रीय आरोग्य अभियान (IDW-NHM) यांचेमार्फत इंटेरीअरच्या कामाचे आदेश दिलेले आहेत. इंटेरीअरचे काम पूर्ण झाले असून ताबा घेण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत पाठपुरावा सुरु आहे. तसेच सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर रक्तकेंद्राची स्थापना करणे, प्रशिक्षणाचे Module तयार करणे इ. बाबींवर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विरार (जि.पालघर) येथील 'सुर्यकिरण' सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये इमारतीची भिंत कोसळून मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(४५) * २००६० श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनवेलपाडा (विरार, जि.पालघर) येथील सुर्यकिरण या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकासाचे काम सुरु असताना दिनांक ०६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास इमारतीची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत साहूबाई सुळे, लक्ष्मीबाई गवाणे व राधाभाई नवघरे या महिला कामगारांचा जागीच मृत्यु होऊन नंदाबाई नवघरे ही महिला जखमी झाली असून उक्त घटनेतील तीन मजूरांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित बांधकाम व्यावसायिक व कंत्राटदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे पुनर्विकासाचे काम करित असलेला वास्तुविशारद इमारतीची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर फरार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करुन मृत्युमुखी पडलेल्या महिला कामगारांच्या कुटुंबियांना व जखमी झालेल्या महिला कामगारांना आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

मे.सूर्यकिरण को.ऑ.हौ.सोसायटीच्या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम चालू असताना दिनांक ०६.०६.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजण्याच्या सुमारास बांधकाम केलेली भिंत कोसळून त्याच्या ढिगाऱ्याखाली चार महिला गेल्याने त्यापैकी तीन महिलांचा मृत्यू झाला असून श्रीमती नंदाबाई गव्हाणे या गंभीर जखमी झाल्या आहेत.

सदर अपघाताशी संबंधित बांधकाम कंत्राटदार, विकासक आणि वास्तु विशारद यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४, ३३७, ३३८ व ३४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०५४५, दि. ०६.०६.२०२३ रोजी विरार पोलिस ठाणे, पालघर येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर अपघाताशी संबंधित बांधकाम कंत्राटदार, विकासक आणि वास्तु विशारद यांचेविरुद्ध गुन्हा दाखल झालेला असून संबंधित कंत्राटदार आणि विकासक हे मा.न्यायालयाच्या आदेशाने जामिनावर मुक्त आहेत. तसेच संबंधित वास्तुविशारद यांना न्यायालयातून अटकपूर्व जामिन मंजूर झालेला आहे.

(३) बांधकामाच्या ठिकाणी दि.०७.०६.२०२३ रोजी दिलेल्या तपासणी भेटीवरुन सदर बांधकामाची जागा ही कामगाराच्या जिवितास, सुरक्षेस व आरोग्यास धोकादायक असल्याचे दिसून आल्यामुळे, सरकारी कामगार अधिकारी, पालघर यांनी सदर बांधकामाच्या जागेवर धोक्याचे कारण दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येईपर्यंत व सदर उपाययोजनेबाबत समाधान होईपर्यंत, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ च्या नियम २६३ अन्वये दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

सरकारी कामगार अधिकारी, पालघर यांचेमार्फत किमान वेतन अधिनियम, १९४८ व इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत मालक/कंत्राटदार यांचेविरुद्ध खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मयत कामगाराच्या वारसदारांना तसेच जखमी कामगारांना अपघात नुकसान भरपाई मिळवून देणेबाबत मा.कामगार न्यायालय तथा आयुक्त, कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक ०७.०६.२०२३ व दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. मयत झालेल्या कामगारांच्या वारसास कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत बांधकाम विकासक व कंत्राटदारास देखील दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तोरणमाळ (ता.आक्राणी,जि.नंदुरबार) या थंड हवेच्या ठिकाणाच्या पर्यटनाच्या विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत

**(४६) * २०३८६ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोरणमाळ (ता.अक्राणी, जि.नंदुरबार) ह्या थंड हवेच्या ठिकाणाचा पर्यटनाच्या दृष्टीने शासनाचा नव्याने विकास आराखडा तयार असून महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान ह्या थंड हवेच्या ठिकाणाच्या विकासाच्या धर्तीवर ‘अ’ दर्जा प्राप्त तोरणमाळच्या पर्यटन व्यवसायाला चालना मिळावी तसेच पर्यटन विकासाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता शासनाने धोरणात्मक आराखड्यात तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन विकास महामंडळाने या भागासाठी आठ कोटींचा विकासनिधी दिला होता परंतु त्याचा योग्य विनियोग न केल्याने हा निधी परत पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तोरणमाळ गिरीस्थानाच्या पर्यटन विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याच्या सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तोरणमाळ या थंड हवेच्या ठिकाणी पर्यटनाच्या विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तातडीने तयार करुन सदर भागातील आदिवासी बांधवाना रोजगारासह इतर अन्य सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) तोरणमाळ विकास आराखडा तयार करणे बाबत मा.प्रधान सचिव (पर्यटन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दि.२७/०६/२०२२ रोजीच्या बैठकीत तोरणमाळ गिरीस्थानाचा पर्यटन विकासाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी पर्यटन संचालनालयास निर्देश दिले आहेत.

(२) नाही.

तोरणमाळ येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पर्यटक निवास येथे सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत दि.०६/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.४९९.०० लक्ष व दि.१८/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१०००.०० लक्ष असे एकूण रु.१४९९.०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.३२०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) तोरणमाळ गिरीस्थानाचा पर्यटन विकासाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम अंतिम टप्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांघर (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) ह्या गावात गढूळ व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(४७) * १९९९४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मांघर (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) हे गाव "मधाचे गाव" म्हणून जाहिर केले असून जंगल व डोंगराळ भागातील सदर गावात शेती व मधाचे संकलन ही प्रमुख रोजगाराची माध्यमे असून शेतीसाठी व दैनंदिन वापरासाठी सदर गावात तीन ते चार दिवसाआड गढूळ व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात हजारो संख्येने पर्यटक भेट देत असून अशुध्द पाण्यामुळे तेथील रहिवाशी तसेच पर्यटक यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गाव हे डोंगराळ भागात असून पाणी मिळविण्यासाठी तेथील नागरिकांना पायपीट करावी लागत असून शेती व्यवसायासाठीही मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्यामुळे त्यांचे आर्थिक उत्पन्नही कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गावातील पाणी टंचाईचे निवारण करुन तातडीने नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा सदर गावांमध्ये सुरळीत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

सदर गावात झऱ्याचे पाणी झऱ्यालगत असणाऱ्या पाणी साठवण टाकीत साठवून पाईपलाईनद्वारे गावात पुरवठा करण्यात येत असे, दरम्यानच्या काळात टाकीच्या दुरुस्तीचे काम चालू असल्याने ३ ते ४ दिवस गढुळ पाणी पाईपलाईनद्वारे गावातील जलकुंभात येत होते, परंतु सदरच्या काळात पिण्यासाठी पर्यायी व्यवस्था ग्रामपंचायतीने केली होती. तद्नंतर नियमित स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा आजतागायत गावात ग्रामपंचायतीमार्फत केला जात आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी भागातील संस्था व ग्रामपंचायतीना अर्थ सहाय्य योजनेद्वारे क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी १००% अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

**(४८) * २०५२२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचेमार्फत अर्थसहाय्य योजनेद्वारे अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यास शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित संस्था, क्रीडा मंडळ यांना अर्थसहाय्य देण्यात येत असून शासनाने दिनांक १ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या निर्णयान्वये शासन व निकषपात्र संस्थांना ७५:२५ टक्के तसेच आदिवासी/विशेष घटक क्षेत्रातील संस्थांना १० टक्के स्वहिश्श्याची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या संस्था तसेच ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती पहाता लोकवर्गणी जमा होणे व स्वहिस्सा भरणे शक्य नसल्याने सदर योजनेत पात्र होत नाहीत अथवा अर्ज करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी क्षेत्रातील संस्था तसेच ग्रामपंचायती यांचा स्वहिस्सा भरण्याची अट रद्द करून निविदाकारीतील दरानुसार १००% अनुदान शासनाने दिल्यास शासनाच्या उद्दिष्टानुसार नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण होणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंची निर्मिती व इतर अनुषंगिक बाबी घडविण्याचे उद्दिष्ट आदिवासी दुर्गम भागात देखील पूर्ण होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेतर्गत आदिवासी क्षेत्रातील संस्था तसेच ग्रामपंचायतींना १००% अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे :** (१) शासन निर्णय दि.१ मार्च, २०१४ अन्वये क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य या योजनेनुसार क्रीडा सुविधा निर्मितीसाठी व क्रीडा साहित्यासाठी अनुदान देण्यात येते. त्यानुसार क्रीडा सुविधेसाठी ७५ टक्के अर्थ सहाय्य शासनाकडून देण्यात येते, तर निकषपात्र संस्थांना २५ टक्के रक्कम स्वहिस्सा खर्च करणे आवश्यक असते. तथापि, क्रीडा साहित्यासाठी शासनाच्या संस्थांना स्वहिश्श्याची अट नाही तसेच आदिवासी व विशेष घटक क्षेत्रातील पात्र खाजगी /अशासकीय संस्थांना क्रीडा साहित्यासाठी १० टक्के स्वहिश्श्याची अट आहे. यासोबतच क्रीडांगण विकास अनुदान योजना व व्यायामशाळा विकास अनुदान योजना या अंतर्गत १०० टक्के अनुदानातून आदिवासी व विशेष घटक क्षेत्रात क्रीडा सुविधा व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) व (३) सन २०२२-२३ या वर्षात आदिवासी व विशेष घटक योजनेंर्गत क्रीडा विषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत व क्रीडा साहित्याबाबत व्यायामशाळा विकास योजनातंर्गत विविध संस्थांनी लाभ घेतलेला आहेत. यासाठी १०० टक्के अनुदानातून मोठ्या प्रमाणात निधी संबंधित संस्थांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच या आर्थिक वर्षातही संस्थांच्या मागणीप्रमाणे व पात्रतेनुसार विहित अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील अनेक अंगणवाडी केंद्राना पोषण आहार शिजविण्याकरिता इंधनासाठीचा भत्ता मिळाला नसल्याबाबत

**(४९) * २०२७१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्राना पोषण आहार शिजविण्याकरिता माहे जून, २०२२ पासून अद्यापपर्यंत इंधन भत्ता मिळाला नसल्याने अंगणवाडी सेविकांना स्वत: आर्थिक भार सोसून गरम ताजा पोषण आहार मुलांना द्यावा लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाच्या काळात पोषण आहार कच्चे धान्य व किराणा मालाच्या स्वरुपात दिला जात होता, तथापि टाळेबंदी मागे घेतल्यानंतर पुन्हा तो शिजवून देण्याबाबत काढण्यात आलेल्या आदेशानुसार सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना शिजवलेला आहार वितरित केला जातो व पोषण आहार शिजविण्यासाठी अंगणवाडीला प्रति विद्यार्थी ६५ पैसे प्रमाणे २० मुलांसाठी दरमहा दिला जाणारा रुपये ३९० इतका इंधन भत्ता अपुरा पडत असून प्रत्यक्षात सिलेंडरसाठी ११५४ रुपये खर्च करावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना वाढीव मानधनाबाबत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याबाबतची मागणी समर्थन संस्थेने पत्रान्वये मा. मंत्री (महिला व बाल विकास विभाग), सचिव (महिला व बाल विकास विभाग), आयुक्त, (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) यांच्याकडे दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील अंगणवाडी सेविकांना अत्यल्प असलेला इंधनाचा भत्ता वाढवून विहित मुदतीत देण्याबाबत तसेच गॅसची स्वतंत्र सोय करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना देण्यात येणारा गरम ताजा आहार शिजवण्यासाठी माहे जून, २०२२ ते मे, २०२३ पर्यत रु.२२.२९ कोटी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. आहार शिजवण्याची देयके व महिला मंडळ/बचत गटांची आहार पुरवठ्याची देयके पारित करण्यासाठी आयुक्त कार्यालयात रु. ४० कोटी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

ज्या ठिकाणी महिला मंडळ/बचत गटांनी गरम ताजा आहार पुरवठा करण्याचे काम सोडून दिले आहे, त्या ठिकाणी अंगणवाडी केंद्रांना कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येतो व अंगणवाडी सेविकांकडून आहार शिजवून वितरीत करण्यात येतो. सन २०१७ पूर्वी गरम ताजा आहारासाठी प्रति दिन प्रति लाभार्थी दर ६ रुपये होता त्यातील ५० पैसे इंधन आणि आहार शिजवण्यासाठी व ५.५० रुपये कच्चे धान्य व किराणा खरेदीसाठी दिले जात होते. सन २०१७ नंतर गरम ताजा आहारासाठी प्रति दिन प्रति लाभार्थी ८ रुपये दर करण्यात आला त्यामध्ये ७.३५ रुपये कच्चे धान्य व किराणा खरेदीसाठी व ६५ पैसे आहार शिजवणे व इंधन खर्च म्हणून मंजूर करण्यात आले आहे.

(३) महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ३.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे मानधनात वाढ करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सदर मंजूर करण्यात आलेली मानधन वाढ माहे एप्रिल, २०२३ पासून लागू करण्यात आली आहे.

(४) अंगणवाडी सेविकांना आहार शिजवण्यासाठी प्रति लाभार्थी प्रति दिन ६५.०० पैसे दिले जातात त्यामध्ये इंधनखर्चाचा समावेश आहे व सदर खर्चाची रक्कम अंगणवाडी सेविकांना नियमितपणे अदा करण्यात येत आहे. केंद्र शासनाने आहाराचे दर वाढविल्यास आहार शिजविणे व इंधन खर्चामध्ये वाढ करण्यात येईल. तसेच ज्या अंगणवाडी केंद्रांना गॅसची स्वतंत्र सोय नाही अशा अंगणवाडी केंद्रांमध्ये जिल्हा वार्षिक योजना निधी आणि जिल्हा परिषद सेस फंडातून गॅस शेगडी खरेदी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ७१ ग्रामपंचायत हद्दीमध्ये डम्पिंग ग्राऊंड तयार करण्याबाबत

**(५०) * २०५५८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) ७१ ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचरा टाकण्यासाठी ग्राउंड नसल्याने रस्त्याच्या बाजूला किंवा इतर ठिकाणी मोकळया जागेत, नदीत किंवा खड्ड्यांमध्ये कचरा फेकला जात असल्यामुळे घन कचऱ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून ओला, कोरडा व जैविक कचरा एकत्र असल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हद्दीत डम्पिंग ग्राउंड नसल्याने इतरत्र कचरा टाकल्यामुळे प्रदूषणात वाढ होऊन रोगराई निर्माण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखले, गव्हाण कराडे, खुर्द, न्हावे, नेरे, पळस्पे, पारगाव, शिरढोण, तरघर, विचुंबे (ता.पनवेल, जि.रायगड) या दहा ग्रामपंचायतीनी डम्पिंग ग्राउंडसाठी सिडको, वन विभाग, पंचायत समिती, एमआयडीसी, जिल्हाधिकारी यांच्याकडे डम्पिंग ग्राउंडसाठी जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राऊंड तातडीने तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

डम्पिंग ग्राउंड उपलब्ध नसल्यामुळे इतरत्र टाकण्यात आलेला कचरा ग्रामपंचायतीकडून नियमितपणे उचलला जात असून स्वच्छतेची काळजी घेण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व १५ वा वित्त आयोग यामधून कंपोस्ट पीट, प्लास्टिक साठवण युनिट इ. द्वारे कचरा व्यवस्थापनाचे काम करण्यात येत असून पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींमधील गावांमध्ये सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कामे करण्यात येत आहेत. तसेच अन्य काही

ग्रामपंचायतींनी डम्पिंग ग्राऊंड करीता सिडको, वन विभाग, एमआयडीसी यांचेकडील जागा मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयांकडे सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात आरोग्य सुविधा उपलब्ध करुन डायलिसीस युनिट स्थापन करण्याबाबत

**(५१) * १८८४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात ३५ डायलिसीस युनिट स्थापित करण्यासाठी शासनाने एक वर्षापूर्वी मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डायलिसीस युनिटपैकी ४ युनिट हे चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील रुग्णालयासाठी स्थापित करण्याचा निर्णय झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यात डायलिसिसचे युनिट वाढणार असल्याने तेथील शहरी व ग्रामीण रुग्णांना अत्यंत माफक दरात या उपचाराची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत १ वर्षापासून कोरोनाची लस उपलब्ध नसल्याने औरंगाबाद येथील शहर व परिसरात फक्त ६७ टक्के लसीकरण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालय, चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथे जेष्ठ व वयोवृध्द, व्याधीग्रस्तांना लसीचा मुबलक साठा उपलब्ध व्हावा तसेच डायलीसीस युनिट सुरु व्हावे यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) सदर डायलिसीस युनिटपैकी १ युनिट (४ डायलिसीस मशीन) हे चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील रुग्णालयासाठी स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सद्यस्थितीत जिल्हा रूग्णालय तसेच मनपा क्षेत्रात नाकावाटे द्यायची कोविड लस उपलब्ध करण्यात आली आहे. औरंगाबाद जिल्ह्यात पहिला डोस ८५.४८ टक्के व दुसरा डोस ६७.२२ टक्के नागरिकांना देण्यात आले आहेत.
(५) कोविड १९ लसीचा साठा उपलब्ध आहे. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथे राज्यस्तरावरुन मे. हाफकिन यांच्या दि. २५/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये डायलिसीस मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत. तसेच आर.ओ.प्लान्टची खरेदी दि. २६/१२/२०२२ च्या पत्रान्वये जिल्हा स्तरावरुन करण्यात आली आहे. लवकरच डायलिसीस युनिट कार्यान्वित होणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हापरिषदेंतर्गत सन २०१९ च्या सेवा ज्येष्ठता यादीनुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत

**(५२) * १८८१६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हापरिषदेंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीत नमुद असणाऱ्या 'क' व 'ड' वर्ग कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणी दि. ११ मे, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये पात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना पडताळणीसाठी बोलविण्यात आले असल्याचे दि. २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २० वर्षांपासून ग्रामपंचायतीमध्ये कमी वेतनावर काम केलेल्या तसेच २०१९ च्या सेवाजेष्ठता यादीमध्ये समाविष्ट असणाऱ्या व शासनाने वयोमर्यादेत दिलेल्या सवलतीनुसार पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सातारा जिल्हा परिषदेने अद्याप पडताळणीसाठी बोलविले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत शासनाने वयोमर्यादेमध्ये दिलेल्या सवलतीतून बाद झालेल्या कर्मचाऱ्यांना देखील विद्यमान भरतीकरिता पात्र समजण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, शासनाच्या सन २०१९ च्या सेवा ज्येष्ठता यादीनुसारच भरतीप्रक्रिया करावी याकरिता जिल्हा परिषद, सातारा ग्रामपंचायत संघटनेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांना निवेदन दिले असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सातारा जिल्हा परिषदेंतर्गत दि.१ जानेवारी, २०२३ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीत नमूद असणाऱ्या 'क' वर्ग कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकरणी शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सातारा जिल्हा परिषदेकडून सन २०१९ च्या सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत १० टक्के आरक्षणानुसार पदांची भरती केलेली असल्याने सन २०१९ च्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ठ असणाऱ्या शासन वयोमर्यादेतील कर्मचाऱ्यांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

(३) व (४) यासंदर्भात दि.१६.३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने दि.२.६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्पष्ट केल्यानुसार, ज्या जिल्हा परिषदांनी सन २०१९ मध्ये १० टक्के ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून अद्यापपर्यंत पदभरती केलेली नाही त्या जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी शासन निर्णय दि.१६.३.२०२३ मधील मुद्दा क्र.३ नुसार, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून १० टक्के पदे जिल्हा परिषद सेवेत भरती करतांना माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनुसार जे ग्राम पंचायत कर्मचारी पात्र होते व आता त्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली असल्याने ते अपात्र होत आहेत, असे सर्व उमेदवार शासन निर्णयाच्या दिनांकापासून दि.३१.१२.२०२३ पर्यंत होणाऱ्या भरती प्रक्रियेस पात्र असतील. तथापि, सातारा जिल्हा परिषदेने सन २०१९ च्या सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचारी १० टक्के आरक्षणानुसार पदांची भरती केलेली आहे.

तसेच, सन २०२३ मध्ये होणाऱ्या सरळसेवेच्या पदभरतीच्या अनुषंगाने दि.१६.३.२०२३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार, १० टक्के ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस दि.३१.१२.२०२३ पर्यंत कमाल वयोमर्यादेत शिथिलता लागू करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## शहापूर आणि मुरबाड या तालुक्यांसह ठाणे जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी टंचाई कृती आराखड्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(५३) * १९५६६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील अनेक गाव-पाडे हक्काच्या हातपंपाच्या पाण्यापासून वंचित असून तालुक्यातील ९७ आदिवासी पाडे व २५९ गावांना नाशिक जिल्ह्यातील भावली धरणातून पाणीपुरवठा करण्याची योजना आखण्यात आली असून या प्रकल्पाचे आतापर्यंत सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाल्यामुळे आदिवासी भागात पाणीटंचाई कायम राहणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील फुगाळे ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५५० एवढी असून ५० ते ६० पशुधनाची संख्या असल्यामुळे दोन दिवसाने उपलब्ध होणारा पाण्याचा टँकर पुरत पाणीसाठा अपुरा पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वी सुरु असणाऱ्या २०० पाणी पुरवठा योजना व १८८ जलजीवन मिशनच्या योजना प्रलंबित असल्याने आजही शहापूर तालुक्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी दरवर्षी रुपये ५० कोटींचा कृती आराखडा तयार करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्यातील असलेल्या धरणातून टँकर लॉबीद्वारे मोटार लावून पाणी उपसा केला जात असून सदर पाणी मुंबई, नाशिक महामार्गावरील हॉटेल व्यावसायिक व रिसोर्ट चालक यांना विकले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील १२५ गावे आणि त्या गावांच्या अखत्यारीत येणाऱ्या वाड्यांमध्ये पाणीटंचाईची समस्या असून खोणी तसेच वडवली (ता. कल्याण, जि.ठाणे) या भागात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होऊन अनेक मोठमोठे गृह प्रकल्प उभे राहत असताना स्थानिक नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याची बाब माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील शहापूर आणि मुरबाड या तालुक्यांसह जिल्ह्यातील सर्व गावांची पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रलंबित असलेल्या पाणी योजना तातडीने मार्गी लावून टंचाई कृती आराखड्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील ९७ गावांसाठी भावली उद्भव घेऊन गुरुत्वाकर्षणावर आधारीत रु. ३१६.४२ कोटी इतक्या किंमतीची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली असून, सदर योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील फुगाळे हे गाव अतिदुर्गम असून, शासन निर्णय दिनांक १६.०५.२०१९ नुसार प्रति व्यक्ती २० लि. प्रमाणे ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार टंचाई कालावधीत १२ हजार लि. क्षमतेच्या टँकरव्दारे दररोज पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

ठाणे जिल्हयाची पाणी टंचाई दुर करण्यासाठी सन २०२०-२१ मध्ये रु. ३२.२९ कोटी व सन २०२१-२२ मध्ये रु. १६.७५ कोटी इतक्या रकमेचे टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत.

भावली ग्रीड योजना कार्यान्वीत होईपर्यंत पुरक नळ पाणी पुरवठा योजना जोडुन टंचाईग्रस्त गांव / पाडयांसाठी तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना करणे आवश्यक असल्याने रु. ४२.९६ कोटी इतक्या वाढीव किंमतीचा मुळ आराखडयात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सन २०२२-२३ चा टंचाई कृती आराखडा रु. ५७.७३ कोटी किंमतीचा मंजूर आहे.

सदर टंचाई कृती आराखडयातून तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती कामे, टँकरने पाणी पुरवठा व विंधन विहीरी घेणे इ. कामे करण्यात येणार आहेत.

(४) हे खरे नाही.

शहापूर तालुक्यातील ४८ गावे व १६३ पाडे अशा एकूण २११ गांव / पाडयांना दिनांक २८.०६.२०२३ पर्यंत ४० टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु होता. तसेच तालुक्यात सुरु असलेल्या टँकरवर जी.पी.एस. प्रणाली बसविण्यात आली असल्यामुळे टँकरने पंपीग स्टेशन पासून नेमुन दिलेल्या गांव / पाडयांना पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(५) मौजे खोणी व वडवली गावांना महाराष्ट्र औद्यागिक महामंडळाच्या जलवाहिनीवरील जलजोडणीव्दारे पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. गावात जुनी वितरणवाहिनी कार्यान्वित असल्यामुळे गावातील काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने सदर भागात टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत खोणी वडवली गावासाठी सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) योजना मंजूर करण्यात आली असून, योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर दोन्ही गावातील ग्रामस्थांना ५५ लिटर दरडोई प्रमाणे पाणी उपलब्ध होणार आहे.

(६) शहापूर आणि मुरबाड या तालुक्यांसह जिल्हयातील सर्व गावांची पाणी टंचाई दुर करण्यासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ठाणे जिल्हयात जिल्हा परिषदेंतर्गत ७८७ गावांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर गावातील योजनांचे कार्यादेश देण्यात आले असून योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

----------------

## स्व.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(५४) * २०६७९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास अपघातग्रस्त रुग्णाला त्वरित उपचार मिळण्याकरिता जाहीर करण्यात आलेल्या स्व.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी होत नसल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या शसननिर्णयाद्वारे सदर योजना हमी तत्वावर राबवण्याची शिफारस करण्यात आली आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अपघातासंदर्भातील सर्व उपचारांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्येच करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन स्व.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२), (३), (४) व (५) दिनांक १४.१०.२०२० च्या स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या शासन निर्णयातील तरतूदीमध्ये सुधारणा करुन रस्ते अपघातासाठीची उपचारांची संख्या ७४ वरुन १८४ अशी वाढविण्यास व उपचाराच्या खर्च मर्यादेत रु. ३०,०००/- वरुन प्रति रुग्ण प्रति अपघात रु. १ लक्ष अशी वाढ करण्यास आणि या योजनेचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत करण्याच्या प्रस्तावास दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
यामध्ये महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रातील रस्ते अपघातात जखमी झालेले महाराष्ट्र व राज्य/ देशाबाहेरील रुग्ण यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील स्व. इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रुग्णालयातील बालरोग तज्ज्ञ व वैद्यकीय अधीक्षक यांच्या हलगर्जीपणामुळे आदिवासी बालिकेचा मृत्यू झाल्याबाबत

**(५५) * २०३४० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व. इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रुग्णालयातील (ता.भिवंडी, जि.ठाणे) बालरोग तज्ज्ञ व वैद्यकीय अधीक्षक यांच्या हलगर्जीपणामुळे कु.सुवर्णा मंगल कातकरी या न्युमोनिया झालेल्या ११ महिन्यांच्या आदिवासी बालिकेचा दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाल्याबाबत समर्थन संस्थेने मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य), सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच सचिव, आरोग्य सेवा संचालनालय यांच्याकडे दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषींविरुध्द कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच आगामी काळात असे दुर्देवी मृत्यू टाळण्याच्या उद्देशाने रुग्णालय प्रशासनाने व शासनाने कोणती खबरदारीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) संस्थेच्या तक्रारीच्या अनुषंगाने सामान्य रुग्णालय, ठाणे यांना चौकशी करण्याकरीता आदेशित करण्यात आले असून त्याअनुषंगाने सामान्य रुग्णालय, ठाणे यांनी चौकशी समिती स्थापन केली आहे.

रूग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रूग्णावर रूग्णालयात उपलब्ध असलेल्या सेवा सुविधानुसार आवश्यक ते सर्व उपचार केले जातात. तसेच उपजिल्हा रूग्णालयाच्या प्रमाणकानुसार व आयपीएचएस च्या मानकानुसार रूग्णहितार्थ सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात व त्यापासून कोणताही रूग्ण वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा धाटाव (जि .रायगड) एमआयडीसीतील रोहा डायकेम या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटाच्या दुर्घटनेदरम्यान कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत

**(५६) * २०३४३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा धाटाव (जि .रायगड) एमआयडीसीतील फुड कलरची निर्मिती करणाऱ्या रोहा डायकेम या कारखान्यात दि.७ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास गोडाऊनला आग लागून झालेल्या दुर्घटनेमध्ये एक कामगार गंभीररित्या जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोहा डायकेम कंपनीत स्फोट झाला त्यावेळी कारखान्यात दोन शिफ्टमध्ये २०० कामगार कामावर हजर होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेनंतर कंपनीने कामगारांना सुरक्षेची साधने पुरवली जात नसल्याचे निदर्शनास आले असून, सदर गोडाऊनमध्ये वारंवार स्फोट घडत असून देखील या कंपनीमध्ये आग विझविण्यासाठी

फायर हाड्रण्ट यंत्रणा कार्यान्वित नसून तेथील कामगारांना संकटातून बाहेर पडण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षणसुद्धा दिले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने रोहा डायकेम कंपनी तसेच अशाप्रकारच्या इतर अनेक कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येतआहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशतः खरे आहे,

रोहा डायकेम प्रा.लि. प्लॉट नं. २३/१/१, एमआयडीसी धाटाव ता. रोहा जि. रायगड या कारखान्यात दि. ०७ जून, २०२३ रोजी दु.१.०० वा. गोडाऊनमध्ये आग लागली. सदर आगीत भाजल्यामुळे एका कामगाराचा दि.१८ जून, २०२३ रोजी उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे.

(२) अंशतः खरे आहे,

घटनेच्या दिवशी सदर कारखान्यात एकुण २२ कामगार कामावर हजर होते.

(३) सदर कारखान्यात आग विझविण्यासाठी फायर हायड्रण्ट यंत्रणा कार्यान्वित असून, कारखान्यातील कामगारांना सुरक्षा साधने पुरविली जातात. आगीच्या घटनेनंतर संकटातुन बाहेर पडण्याच्या दृष्टीने कामगारांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते व त्याअनुषंगाने वेळोवेळी रंगीत तालीमीचे आयोजन केले जात असल्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी कळविले आहे.

(४) सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची दि.०७.०६.२०२३ व दि.१७.०६.२०२३ रोजी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान कारखान्याच्या गोडाऊनमध्ये आयात केलेला इंडोनेशियन कोळसा, इतर ज्वलनशिल रसायन व ज्वलनास मदत करणारे रसायन "सोडियम नायट्राईट" (ऑक्सिडायझिंग मटेरीयल) एकत्रितपणे साठविण्यात आले होते. घटनेच्या दिवशी सदर कोळशाने विशिष्ट तापमानावर पेट घेतला व तेथील रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे आग लागली व त्या परिसरात पसरली.

तसेच, चौकशीमध्ये महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियमांचा भंग आढळल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द दि.१०.०७.२०२३ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांचे न्यायालयात खटला क्र.७४१/२०२३ दाखल करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त रोहा पोलिस स्टेशन, रोहा येथे आकस्मिक मृत्यू रजि.नं.२४/२०२३ अशी नोंद घेण्यात आली आहे.

तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सदर कारखान्यास दि.२०.०६.२०२३ रोजी प्लॉट नं.२३/२ वरील कामकाज बंद ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच, दुर्घटनेदरम्यान निर्माण झालेला घातक घनकचरा विल्हेवाटीकरिता पाठविण्याबाबत प्रक्रिया केंद्राला सुचना देण्यात आल्या आहेत.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली व औद्योगिक संघटना यांच्यामार्फत धाटाव एमआयडीसी रोहा या औद्योगिक वसाहतीमध्ये असणाऱ्या रासायनिक व इतर कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. तसेच आपत्कालीन परिस्थिती योग्यरित्या हाताळण्याकरीता वेळोवेळी कारखान्यामध्ये रंगीत तालीम (Mock drill) आयोजित केली जात असल्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.